cmyk

दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com | नवी दिशा... नवे विचार..... | email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१०३ | गुरूवार, दि.७ ऑगस्ट २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

**संपादकीय**

## निवडणूक याद्यांचा घोळ सरकारच्या अंगाशी येणार !

बिहारमध्ये सध्या मतदार याद्यांच्या गहन पुनरीक्षणाचा विषय फारच ताणला गेला आहे. इंडिया आघाडीतील सर्वच विरोधी पक्षांनी हा विषय गेले जवळपास पंधरा दिवस संसदेतही लावून धरला आहे. तेथे रोजच त्यावरून निदर्शने सुरू आहेत. सभागृह सुरू झाले की तेथे त्यावरून फलक फडकवले जातात आणि गदारोळ करून कामकाज बंद पाडले जाते, एकदा कामकाज तहकूब झाल्यानंतर विरोधी पक्षांची खासदार मंडळी सभागृहातले फलक पुन्हा बाहेर येऊन फडकवतात आणि घोषणाबाजी करतात, हे चित्र संसद अधिवेशन सुरू झाल्यापासूनचे आहे. त्यांना संसदेत यावर चर्चा हवी आहे,

## तुळजाभवानीच्या गाभाऱ्यातील दर्शन २० ऑगस्टपर्यंत बंद

तुळजापूर: तुळजाभवानी देवीच्या गाभाऱ्यातील दर्शन २० ऑगस्टपर्यंत बंद राहणार आहे. संवर्धनाचे काम अपूर्ण राहिल्याने सुरळीत दर्शन सुरू होऊ शकत नाही अशी माहिती मंदिर संस्थानाने दिली आहे. देवीचे मुखदर्शन, सिंहासन पूजा, अभिषेक पूजा नियमित सुरू राहणार आहे. त्यामुळे ज्या भाविक –भक्तांना गाभाऱ्याचे दर्शन करायचे आहे त्यांचा मात्र हिरमोड होणार आहे. गाभाऱ्याच्या दर्शनाऐवजी आता केवळ मुख दर्शन घेऊनच भाविकांना समाधान मानावे लागणार आहे. तरी २० ऑगस्टनंतर पुन्हा गाभाऱ्याचे दर्शन सुरू होणार आहे. त्यामुळे सध्या तरी भाविकांना या तारखेची वाट पाहवी लागणार आहे.

# ई–पीक पाहणी करा अन्यथा लाभावर फिरेल पाणी !

## बदलत्या काळानुसार शेतकऱ्यांनी आधुनिकतेवर भर देणे गरजेचे

**बीड । प्रतिनिधी**

**सध्या खरीप हंगामातील पीक पाहणीची कार्यवाही सुरू झाली आहे. खरीप हंगामासाठी ई–पीक पाहणी डीसीएस मोबाईलचे ॲप व्हर्जन ४.०० अद्ययावत स्वरूपात गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध करण्यात आले आहे. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांनी ॲप अपडेट करून घेण्याचे आवाहन महसूल विभागाकडून करण्यात आले आहे. मुदतीमध्ये ई–पीक पाहणी शेतकऱ्यांनी केली नाही तर पिक विम्यासह इतर लाभाला सुध्दा मुकावे लागणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आधुनिकतेवर भर देणे काळाची गरज आहे.**




शेतकऱ्यांनी ई–पीक पाहणीची नोंद न केल्यास शेतकऱ्यांना विविध प्रकारच्या समस्यांना तोंड देण्याची शक्यता नाकारता येत नाही. नोंद न केल्यास सरकारच्या विविध योजना, अनुदान वाटप, आपत्ती संबंधी मिळणाऱ्या अर्थसहाय्याला शेतकऱ्यांना मुकावे लागण्याची वेळ येऊ शकते. त्यामुळे ई–पीक पाहणी करणे गरजेचे बनले आहे. ई–पीक पाहणी डीसीएस मोबाईल ॲपच्या साह्याने सर्व शेतकऱ्यांनी मोबाइलद्वारे सातबारा उताऱ्यावर शेतात लागवड केलेल्या खरीप पिकांची नोंदणी १ ऑगस्टपासून सुरू झाली आहे. ॲपद्वारे शेतकऱ्यांनी पिकांची माहिती स्वतः भरण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. मोबाईलवर

▶▶ पान २ वर

### ई–पीक पाहणी न केल्यास काय होणार?

ई–पीक पाहणी केल्यास योजनांचा लाभ मिळण्यासाठी याची मदत होणार आहे. या ॲपद्वारे शेतातील पिकांची नोंद स्वतः शेतकऱ्याने शेतात जाऊन करावयाची आहे. तसे न केल्यास सातबारा कोरा राहू शकतो. परिणामी, सरकारकडून मिळणारी मदत, पीकविमा, पीक कर्ज मिळण्यात अडचणी निर्माण होणार आहेत. शेतकऱ्यांच्या अत्यंत जिव्हाळ्याच्या असलेल्या पीक पाहणी संबंधी 'माझी शेती, माझा सातबारा, मीच नोंदवणार माझा पीक पेरा' या संकल्पनेनुसार ई–पीक पाहणी ॲप उपलब्ध करून देण्यात आले आहे.

## थोडक्यात...

### ट्रम्पने भारतावर लादला २५ टक्के अतिरिक्त कर

नवी दिल्ली- अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताला पुन्हा दणका दिला आहे. अमेरिकेने भारतावर २५ टक्के अतिरिक्त कर लादण्याची घोषणा केली आहे. अमेरिकेने हा निर्णय घेताना म्हटले आहे की, भारताने रशियन तेलाची सतत खरेदी केल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे. याआधी अमेरिकेने भारतावर २५ टक्के टॅरिफ लावला होता. त्यामुळे आता अमेरिकेचा एकूण कर ५० टक्के झाला आहे. ही भारतासाठी चिंतेची बाब आहे.

### ढगफुटीत अडकलेले ५१ तरुण सुरक्षित

मुंबई–उत्तराखंडमध्ये ढगफुटी होऊन ७० पेक्षा नागरीक बेपत्ता झाले असून यात महाराष्ट्रातील ५१ पर्यटक सुरक्षित आहेत. यामध्ये नांदेड जिल्ह्यातील ११ व इतर जिल्ह्यांतील ४० अशा ५१ पर्यटकांचा समावेश असून हे सर्व पर्यटक सुखरूप असल्याची माहिती राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून देण्यात आली.

### लाडकी बहिण फसवणूक; दोषींवर सरकारची कारवाई?

मुंबई–लाडकी बहीण योजना अंतर्गत अनधिकृत लाभ घेतल्याच्या प्रकरणात दोषींवर मोठी कारवाई होण्याची शक्यता आहे. १५ दिवसांत सर्व जिल्हाधिकारींकडून खात्यांची माहिती मागवली असून दोषी आढळलेल्या लोकांकडून संपूर्ण रक्कम वसूल केली जाणार आहे. संबंधितावर गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता आहे.

### आरती साठेंचे नाव सरन्यायाधीशांनी वगळावे –पवार

मुंबई–आरती साठेंची न्यायाधीश म्हणून नियुक्ती करु नका, आरती साठे या भाजपच्या प्रवक्त्या होत्या. आमची केस अशा न्यायाधीशांकडे गेल्यास न्याय मिळेल का? आरती साठेंचे नाव सरन्यायाधीशांनी वगळावे अशी विनंती आ. रोहित पवार यांनी केली आहे.

# दादा झाडे लावणार पण झाडे जगणार कशी चार–चार इंचाचे खड्डे त्यात लावणार झाडे

**बीड । प्रतिनिधी**

**जिल्ह्यात आज ७ ऑगस्ट रोजी 'हरित बीड' अभियानांतर्गत वृक्षारोपण मोहिमेचे शुभारंभ पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते खंडेश्वरी परिसरात होत आहे पण ज्या ठिकाणावर झाडे लावली जाणार आहेत त्या झाडासाठी केवळ चार ते पाच इंचाचे खड्डे केले आहेत त्यात हि झाडे तग कशी धरणार किमान पाच फुटाचे खड्डे केले असते तर काहीकाळ झाडे जगली असती एकाच दिवशी तब्बल ३० लाख वृक्षारोपण करण्यात येणार असल्याने सगळीकडे असेच चित्र असेल तर झाडे टिकणार कशी हा मोठा प्रश्न आहे.**



वृक्षारोपण ही काळाची गरज असल्याचे स्पष्ट करताना, नैसर्गिक आपत्तीपासून संरक्षण, हवामान संतुलन, तसेच पाण्याची पातळी सुधारण्यास मदत होत असल्याचे जाणकारांकडून सांगण्यात येते. झाडांमुळे हवेतील कार्बन डायऑक्साइडचे शोषण होऊन हवा शुद्ध राहते आणि तापमान नियंत्रणात राहते. मात्र, इतक्या मोठ्या प्रमाणावर झाडे लावण्यात येत असली तरी त्यांचे संगोपन, संरक्षण व देखभाल ही खरी आव्हानात्मक बाब आहे. नुकत्याच पार पडलेल्या प्रशासनाच्या बैठकीत ७० टक्के झाडांचे संगोपन होईल,असे सांगण्यात आले. यावर काही पर्यावरण प्रेमींनी शंका व्यक्त करत झाडे लावणं सोपं, पण टिकवणं कठीण,असे

▶▶ पान २ वर

## जिल्हा रुग्णालयाच्या आयसीयू विभागात आग

बीड । प्रतिनिधी

येथील जिल्हा रूग्णालयातील अतिदक्षता विभागात आज सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास अचानक शॉटसर्किट होऊन वायरिंगमध्ये आग लागली. अतिदक्षता विभागातच हा प्रकार घडल्यामुळे रूग्णांसह डॉक्टर कर्मचाऱ्यांची चांगलीच धावपळ उडाली.

अतिदक्षता विभागातील इलेक्ट्रीक बोर्डाजवळील वायरिंगने अचानक पेट घेतला. त्यामुळे बोर्डाजवळ आग लागल्याचे पाहुन तेथील रूग्णांसह डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांची एकच धावपळ उडाली. तेथील काही कर्मचाऱ्यांनी तत्परता दाखवत ज्या ठिकाणी शॉटसर्किट होऊन आग लागली होती ती आग विझवली. सुदैवाने वायरिंगमधील आग पुढे पसरली नाही. त्यामुळे दुर्घटना टळली. दरम्यान या प्रकारामुळे जिल्हा रूग्णालयातील सुरक्षिततेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून अतिदक्षता विभागासह इतर वार्डातील वायरिंग तपासून घेण्याची गरज आहे.मागील काळात रुग्णालयातील अनेक कामे करण्यात आली होती त्यात या कामाचा देखील उल्लेख आहे मग जर संबंधिताने काम व्यवस्थित केलेले नसेल तर त्याच्याकडून दुरुस्ती करून घेण्यात यावी शिवाय जिल्हारुग्णालयात अनेक रुग्ण असतात आणि अशी घटना घडली तर प्रशासनाला तोंड द्यावे लागणार आहे.

## महादेव मुंडे हत्याप्रकरणी एसआयटी प्रमुखाचे आवाहन

बीड । प्रतिनिधी



परळी तालुक्यातील भोपला येथील महादेव मुंडे हत्या प्रकरणात एसआयटीने तपास हाती घेतला आहे. त्या अनुषंगाने महादेव मुंडे यांच्या हत्येबाबत काही माहिती द्यायची असल्यास संबंधितांनी माझ्या वैयक्तीक मोबाईल क्रमांक ९९९०७८२४३१ या क्रमांकावर संपर्क साधावा,असे आवाहन एसआयटी प्रमुख पंकज कुमावत यांनी केले आहे.

एसआयटीचे प्रमुख पंकज कुमावत यांनी नागरीकांना आवाहन केले आहे की, महादेव दत्तात्रय मुंडे (रा.भोपला ता.परळी ह.मु.बँक कॉलनी, परळी) यांची दि.२१ ऑक्टोबर

▶▶ पान २ वर

# मुंडे बहीण–भावांची अजित दादांच्या दौऱ्याकडे पाठ

## भाजपच्या राजाभाऊ मुंडे यांच्या राष्ट्रवादीत प्रवेशावरून नाराज असल्याची चर्चा

**बीड । प्रतिनिधी**

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार हे दोन दिवसाच्या बीड जिल्हा दौऱ्यावर असूनही मंत्री पंकजाताई मुंडे व माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे या दोघांनीही अजित पवारांच्या या दौऱ्याकडे पाठ फिरवली आहे.**





पूर्वी भाजपमध्ये अनेक वर्षांपासून असलेले राजेभाऊ मुंडे व त्यांच्या सहकाऱ्यांचा मुंडे बहीण भावांना टाळून प्रकाश सोळंके यांच्यामार्फत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश अजित पवारांचे उपस्थितीत होत असून या प्रवेशावरून दोन्हीही मुंडे बहीण भाऊ नाराज असल्याची चर्चा संबंध जिल्ह्यात रंगली आहे. एकाच पक्षात असूनही प्रकाश सोळंके यांचे सातत्याने धनंजय मुंडेंवर आरोप करणे तसेच पंकजा मुंडे यांच्या बाबतही अनास्था दाखवणे, प्रकाश सोळंके यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा बीड जिल्ह्यात ओबीसींसाठी राखीव असून मराठा समाजाच्या विरुद्ध असल्याचे बोलणे, तसेच त्यातून ओबीसी समाजामध्ये निर्माण झालेली नाराजी याहीमुळे कदाचित मुंडे बहीण भावांनी अजित पवारांच्या या दौऱ्याकडेच पाठ फिरवल्याची चर्चा आहे. मागील ३५ वर्षांपासून स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे

▶▶ पान २ वर

## शेख जमीर समग्र शिक्षा अभियानचे उपशिक्षणाधिकारी



**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात प्रभारी उपशिक्षणाधिकारी म्हणून ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी शेख जमीर यांची प्रभारी कार्यभार देण्यात आला आहे. बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी मंगळवार दिनांक ५ ऑगस्ट २०२५ रोजी सदर आदेश निर्गमित केले आहेत. बीड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातील उप शिक्षणाधिकारी

▶▶ पान २ वर

## फडणवीस–शिंदेंमध्ये शीतयुद्ध सुरू?

### बेस्टच्या महाव्यवस्थापक पदासाठी दोन ऑर्डर निघाल्या



**मुंबई । प्रतिनिधी**

फडणवीस सरकार सत्तेत आल्यापासून फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्यात विविध मुद्द्यावरुन शितयुध्द सुरु असल्याचे दिसत आहे. आता यात आणखी एक भर पडताना पाहायला मिळत आहे. बेस्टच्या महाव्यवस्थापक पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यासाठी दोन वेगवेगळ्या ऑर्डर निघाल्यामुळे पुन्हा वादाला तोंड फुटले आहे.

बेस्टचे महाव्यवस्थापक श्रीनिवास हे सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांच्या जागी अतिरिक्त कार्यभार सनदी अधिकाऱ्याला देण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या सामान्य प्रशासन विभागाने आशिष शर्मा यांची ऑर्डर काढली. तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नगरविकास विभागाने अश्विनी जोशी यांची एकाच दिवशी ऑर्डर काढली. त्यामुळे

▶▶ पान २ वर

## गोट्या गित्तेवर तब्बल ४३ गुन्हे


बीड । प्रतिनिधी

परळीतील व्यापारी महादेव मुंडे यांच्या हत्या प्रकरणामध्ये गोट्या गित्ते हा संशयित आरोपी आहे. सध्या त्याच्यावर ४३ गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. त्याच्यावर मकोका अंतर्गत कारवाई सुध्दा केली आहे.

महादेव मुंडे खून प्रकरणात गोट्या गित्ते हा संशयित आरोपी आहे. सध्या तो फरार असून आरोपी गोट्या गित्तेचा पोलीस शोध घेत आहेत. मात्र त्याच गोट्या गित्तेवर

▶▶ पान २ वर

## राजाभाऊ मुंडेंचा राष्ट्रवादीत प्रवेश बीडच्या राजकारणाला नवे वळण


**वडवणी । प्रतिनिधी**

बीडच्या राजकारणात गेल्या काही दशकांपासून भाजपचा एक भक्कम आधारस्तंभ असलेल्या राजाभाऊ मुंडे यांनी अखेर भाजपला रामराम ठोकत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटात आज प्रवेश केला आहे. वडवणी येथे माजलगावचे आमदार प्रकाश सोळंके यांच्या उपस्थितीत हा ऐतिहासिक प्रवेश सोहळा पार पडणार आहे. राजकीयदृष्ट्या या घटनाकडे घराणेशाहीविरोधात निर्माण झालेली नवी मुभा म्हणून पाहिलं जात आहे, तर काही जणांच्या मते हा निर्णय म्हणजे कार्यकर्त्यांच्या संयमाचा विस्फोटच आहे.

राजाभाऊ मुंडे हे भाजपमधील ते नेते, ज्यांनी कुठलीही पदाची हाव न ठेवता संघटनेच्या बांधणीसाठी स्वतःला झोकून दिलं. त्यांनी गोपीनाथ मुंडे यांचे

▶▶ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०६ ऑगस्ट २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १५६.०० क्विंटल | २,५०० | २,७९१ | २,६६० |
| ज्वारी/हायब्रिड : ३५.०० क्विंटल | १,८०० | २,८०१ | २,४१६ |
| मका/लोकल:१.५० क्विंटल | २,१०४ | २,१०४ | २,१०४ |
| तूर : १३.५० क्विंटल | ६,३०० | ६,३०० | ६,३०० |
| उडीद : १.५० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: ३६.५० क्विंटल | २,०५० | २,८४० | २,५९४ |
| मुग: ३.०० क्विंटल | ६,६०० | ६,६०० | ६,६०० |
| सोयाबीन: ४.५० क्विंटल | ४,१०० | ४,६११ | ४,३५५ |
| हरभरा: ११.०० क्विंटल | ४,५०० | ६,८१० | ५,९०९ |




# एसटी डेपो आता ६० ऐवजी ९८ वर्षांच्या भाडेपट्ट्यावर देणार

## सुधारित धोरणास मंत्रिमंडळाने दिली मंजुरी ; उत्पन्न वाढवण्याचा प्रयत्न

**मुंबई । प्रतिनिधी**

**एसटी महामंडळाला आर्थिक अडचणीतून बाहेर काढण्यासाठी एसटी डेपो भाडेपट्ट्यावर देण्याच्या सुधारित धोरणाला राज्य मंत्रिमंडळाने मंगळवारी मान्यता दिली. सुधारित धोरणानुसार महामंडळाच्या जमिनींच्या भाडेपट्टा कराराचा कालावधी आता ६० वर्षांऐवजी ४९ वर्षांच्या दोन टप्प्यात मिळून ९८ वर्षे करण्यात आला आहे.**



या कालावधीवाढीमुळे महामंडळाच्या प्रस्तावित प्रकल्पांच्या विकासाला गती लाभेल, असा विश्वास सरकारला आहे. या धोरणानुसार खासगी भागीदारांना बसस्थानकांच्या पुनर्विकासाचे हक्क दिले जातील. त्या बदल्यात त्यांच्याकडून प्रीमियम आकारण्याऐवजी विकसित करण्यात आलेल्या व्यापारी

▶▶ पान २ वर

cmyk

अग्रलेख

# निवडणूक याद्यांचा घोळ सरकारच्या अंगाशी येणार !

बिहारमध्ये सध्या मतदार याद्यांच्या गहन पुनरीक्षणाचा विषय फारच ताणला गेला आहे. इंडिया आघाडीतील सर्वच विरोधी पक्षांनी हा विषय गेले जवळपास पंधरा दिवस संसदेतही लावून धरला आहे. तेथे रोजच त्यावरून निदर्शने सुरू आहेत. सभागृह सुरू झाले की तेथे त्यावरून फलक फडकवले जातात आणि गदारोळ करून कामकाज बंद पाडले जाते, एकदा कामकाज तहकूब झाल्यानंतर विरोधी पक्षांची खासदार मंडळी सभागृहातले फलक पुन्हा बाहेर येऊन फडकवतात आणि घोषणाबाजी करतात, हे चित्र संसद अधिवेशन सुरू झाल्यापासूनचे आहे. त्यांना संसदेत यावर चर्चा हवी आहे, पण सरकार चर्चेला अनुमती देत नाही. सरकारने असा पवित्रा घेतला आहे की मतदार याद्यांचे पुनरीक्षण हा विषय निवडणूक आयोगाच्या अखत्यारीत येतो, त्याच्याशी सरकारचा संबंध नाही. त्यामुळे संसदेत त्यावर चर्चा करता येणार नाही. सरकारचा हा आव साळसूदपणाचा आहे आणि त्यांचे म्हणणे असे की संसदेत यावर चर्चा करायला अनुमती जरी दिली तरी त्या चर्चेला कोणत्या खात्याचा मंत्री उत्तर देणार? कारण हा विषय कोणत्याच खात्याच्या अंतर्गत येत नाही, अशीही सरकारची भूमिका आहे. पण त्यावर विरोधी पक्षही हार मानायला तयार नाहीत. त्यांना कोणत्याही परिस्थितीत या विषयावर संसदेत चर्चा हवीच आहे.

मध्यंतरी अशी एक बातमी उठवली गेली होती की, सरकारने या पेचप्रसंगावर तोडगा म्हणून निवडणूक प्रक्रियेतील सुधारणा या विषयावर सभागृहात चर्चा घडवून आणण्याचे संकेत दिले आहेत. मग निवडणूक प्रक्रियेतील या चर्चेत बिहारमधील सध्याच्या एसआयआर विषयावरसुद्धा विरोधक आपली मते मांडू शकतील असा एक मधला मार्ग काढायचा निर्णय सरकारने घेतला आहे, असे सूचित केले गेले. पण ती बातमीसुद्धा खरी नव्हती. कारण सरकारने अधिकृतपणे तसा प्रस्तावच मांडलेला नाही. त्यामुळे हा पेचप्रसंग कायम आहे. जर बिहारमधील मतदार याद्यांच्या दुरुस्तीच्या कामात मोठ्या प्रमाणावर घोळ झाला आहे असा जर विरोधकांचा आरोप असेल तर त्यावर चर्चा करायला काय अडचण आहे हे समजत नाही. संसद हे देशातल्या सगळ्याच महत्त्वाच्या विषयावर चर्चा करण्यासाठीचे व्यासपीठ आहे आणि निवडणूक प्रक्रिया ही लोकशाहीचा मूलभूत आधार आहे. त्या प्रक्रियेविषयीच विरोधी पक्ष साशंक असेल, तर हा विषय केवळ निवडणूक आयोगाचा आहे असे सांगून सरकारला हात झटकता येणार नाही. बिहारमध्ये नव्याने जी मतदार यादी तयार केली जात आहे त्यातील सुमारे ६५ लाख मतदार वगळले गेले आहेत आणि ही यादी आता सर्व मतदारांसाठी आणि राजकीय पक्षांसाठी खुली करण्यात आली आहे.

त्या यादीत पात्र मतदारांची नावे आहेत की नाही हे तपासून तक्रारी दाखल करण्याचे आवाहन निवडणूक आयोगाने केले आहे आणि त्यासाठी महिनाभराची मुदत देण्यात आली आहे. त्यानंतर ही मतदार यादी अंतिम केली जाणार आहे. केवळ दोन महिन्याच्या अवधीत कोट्यवधी मतदारांच्या पुनरीक्षणाचा हा विषय का रेटून नेला जात आहे आणि ऐन निवडणुकीच्या पार्श्वभूमीवरच ही प्रक्रिया का केली जात आहे हा विरोधकांचा मुख्य आक्षेपाचा मुद्दा आहे. आयोगाने बिहारमध्ये नव्याने जी मतदार यादी तयार केली आहे त्यातही प्रचंड गोंधळ आहे, अनेक मृत मतदारांची नावे त्यात समाविष्ट आहेत, अनेक हयात मतदारांची नावे त्यातून वगळली गेली आहेत.

प्रत्येक राज्यातील निवडणुका आल्या की तेथे बांगलादेशी घुसखोरांची मोठी संख्या असल्याचा दावा केला जातो, बिहारमध्येही तसाच दावा केला गेला होता; पण जी नवीन प्रारूप मतदार यादी जाहीर झाली आहे त्यात विदेशी मतदार आढळून आलेले नाहीत असे निदान निवडणूक आयोगाच्या निवेदनातून तरी स्पष्ट झाले आहे, पण या यादीतील बाकीचा जो घोळ आहे त्याचा मुद्दा कायम आहे. भारतीय जनता पक्षाने निवडणूक आयोगाची यंत्रणा हाताशी धरून त्यांना विरोध असलेल्या मतदारांची नावे यादीतून जाणीवपूर्वक वगळली आहेत असा विरोधी पक्षांचा नेमका आरोप आहे. पण हा आरोप भाजपकडून सातत्याने फेटाळून लावला गेला आहे. नुसता आरोप करणे आणि तो फेटाळून लावणे यातून मूळ समस्या संपत नाही. त्यामुळे बिहारमधील एसआयआर प्रक्रियेच्या संबंधात लोकसभेत चर्चेला अनुमती देणे आणि दोन्ही पक्षाचे म्हणणे संसदेच्या व्यासपीठावरून लोकांपुढे मांडणे हाच एक सोयीचा मार्ग वाटतो आहे. त्यावर सरकारने विचार करायला हवा. हा विषय केवळ बिहारपुरता मर्यादित नाही तर तामिळनाडू, पश्चिम बंगाल आणि अन्य राज्यांशीही संबंधित आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार यादीमध्ये लाखो लोकांची नावे समाविष्ट करणे किंवा लाखो लोकांची नावे अचानक काढून टाकणे हा संशयाला निमंत्रण देण्याचाच विषय आहे, त्यावर एकदाचा सोक्षमोक्ष लावणे गरजेचे आहे. त्यामुळे विरोधकांना यावर चर्चा हवी असेल, तर सरकारने त्यात आडकाठी करता कामा नये.

मतदार यादीमध्ये कसा घोळ केला जातो याचे ठोस पुरावे उपलब्ध असल्याचा दावा काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केला असून, येत्या आठ तारखेला हे पुरावे त्यांनी जनतेपुढे उघड करायचे ठरवले आहे, आम्ही जो गौप्यस्फोट करू तो अणुबॉम्बच्या क्षमतेचा आहे आणि त्यानंतर देशातील निवडणूक आयोग गायब होईल अशी आव्हानात्मक भाषा ही राहुल गांधी यांनी केली आहे, त्यामुळे एकूणच हा विषय आता निर्णायक पातळीवर येऊन ठेपला आहे.

## जल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी घेतला विविध विभागांचा आढावा

**जालना । प्रतिनिधी**

**जिल्ह्यात १ ते ७ ऑगस्ट या कालावधीत महसूल सप्ताह साजरा करण्यात येत आहे. महसूल सप्ताहाच्या अनुषंगाने स्व. पंतप्रधान भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी नाट्यगृह परतूर येथे परतूर तहसील कार्यालयाच्यावतीने आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी उपस्थित राहून महसूल विभागातील उत्कृष्ट कार्य करणारे महसूल अधिकारी व कर्मचारी यांचा गौरव केला. तसेच शासनाच्या विविध विभागाच्या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना मंजुरीपत्राचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमास उदघाटक म्हणून आमदार बबनराव लोणीकर, जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम., उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड, तहसीलदार डॉ.प्रतिभा गोरे, छाया पवार यांच्यासह संबंधित यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते.**



तहसील कार्यालय परतूरला भेट देवून अधिकारी-कर्मचाऱ्यांचा आढावा घेतला तसेच संपुर्ण तहसील कार्यालयाची पाहणी करून संबंधित यंत्रणेला कार्यालयीन परिसर स्वच्छ आणि सुव्यवस्थित ठेवण्याच्या सुचना दिल्या. तहसील कार्यालयात भेट देणारे नागरिक व अधिकारी-कर्मचारी यांच्यासाठी पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह अणि अभ्यागत कक्षात सुधारणा करण्याचे निर्देश दिले. तसेच परतूर शहरातील विविध परिसरात प्लास्टिकचा कचरा दिसून आल्याने त्याची विल्हेवाट लावण्याबाबत लोकसहभागातून कार्यवाही करण्याचे निर्देशही संबंधित अधिकाऱ्यांना दिले. त्यानंतर परतूर शहरातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला भेट देवून विद्यार्थ्यांचे अध्ययन कौशल्य व गुणवत्ता सुधारण्याबाबत सुचना दिल्या आणि शिक्षक व विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधला. तसेच परतूर शहराजवळील समाज कल्याण विभागाच्या नूतन डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलींच्या शासकीय वसतिगृहास भेट देऊन तेथील स्वच्छता, सुविधा व व्यवस्थापनाची पाहणीही त्यांनी यावेळी केली.

## घरकुलाचे हप्ते टाकण्यासाठी द्यावा लागते टक्केवारी

### बावनकुळे साहेब टक्केवारी घेणाऱ्याचा बंदोबस्त करा

**अंबड । प्रतिनिधी**

**अंबड पंचायत समिती अंतर्गत विविध घरकुल योजनेचे हप्ते टाकण्यासाठी इंजिनिअर पैशाची मागणी करत असल्याने सर्वसामान्य गोरगरीब लाभार्थी यांना अडवणूक करणाऱ्या इंजिनीयर यांच्या निषेधार्थ पंचायत समिती समोर धरणे आंदोलन करण्यात आले यावेळी अशी माहिती उपमुख्यमंत्री शिंदे गटाचे राहुल खरात यांनी दिली यावेळी बोलताना ते म्हणाले की खाजगी इंजिनियर घेणारे टक्केवारी यांच्यामार्फत काही अधिकारी व लोकप्रतिनिधी यांना पण टक्केवारी दिले जातात असे पण बोलल्या जात आहे याचा बंदोबस्त राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी करावे व तसेच गरिबाला न्याय द्यावे अशी मागणी करण्यात येत आहे.**



घरकुल योजनेचे हप्ते मिळत नसल्याने अंबड पंचायत समिती कार्यालयासमोर सरपंच पांडुरंग तारख व लाभार्थी यांनीआमरण उपोषण सुरु केले होते. अधिकाऱ्यांच्या लेखी आश्वासनानंतर सदर उपोषण मागे घेण्यात आले. सरपंच येणे लेखी आश्वासनानंतर उपोषण घेतले मागे अनेक गावात विविध योजनेतील घरकुलाचे बांधकाम बालू आहे. संबधित अभियंता यांनी जीओ टॅगींगमध्ये संबंधित योजेनील पर बांधकामाचे फोटो लावून परंतु ३ ते ४ महिने झाले तरीही घरकुलाया दुसरा, तिसरा व चौथा हप्ता मिळाला नाही. त्यामुळे घरकुलाचे लाभार्थी अडचणीत आले आणी बांधकाम थांबले आहे. ग्रामपंचायतचे पदाधिकारी व संबंधित घरकुल योजनेतील लाभार्थी हे अंबड पंचायत समिती कार्यालय येथे वारंवार चकरा मारूनमारूनही अधिकारी दखल घेत नसल्याने वैतागलेल्या सरपंच व लाभार्थी यांनी आमरण उपोषण सुरु केले होते. लवकरात लवकर घरकुलाचा हप्ता टाकण्याचे मागणी करण्यात आली तसेच टक्केवारी घेणाऱ्याचा पण बंदोबस्त करण्यात यावा नसता १५ ऑगस्टला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करण्यात येईल असा इशारा देण्यात आला अंबड तालुक्यातील अनेक गावातील घरकुलाचे पैसे वेळेवर मिळत नाही. त्यामुळे लाभार्थी अडचणीत आहेत. घरकुलाचे हप्ता तात्काळ वितरीत झाले नाही तर दि. १५ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला यासंदर्भात आपण अंबड पंचायत समितीचे गट विकास अधिकारी ज्योती कवडदेवी यांनी यांना विचारले असता ते म्हणाले की लवकरात लवकर घरकुलाचा हप्ता टाकण्याचा प्रयत्न करण्यात येईल असे सांगण्यात आले.

## खाजगी वैद्यकीय महाविद्यालयातील शुल्क वाढ रद्द करा-डॉ.संजय तांदळे

बीड । प्रतिनिधी

शुल्क नियामक प्राधिकरणाकडून राज्यातील खाजगी वैद्यकीय महाविद्यालयाची एक लाख पर्यंत शुल्क वाढ नुकतीच केलेली आहे. चार वर्षाचे वैद्यकीय शिक्षण पूर्ण करण्यासाठी खाजगी वैद्यकीय महाविद्यालयामध्ये साधारणपणे ६० ते ७० लाख मोजावे लागतात. अभिमत विद्यापीठांमध्ये हा खर्च जवळपास एक कोटीच्या घरात जातो . शिकवणी , विकासनिधी , वसतिगृह , जेवणावळ ,ग्रंथालय, जिमखाना ,प्रयोगशाळा आदी शुल्कांबरोबर ५० हजार रुपये मुदत ठेव घेतली जाते. ही रक्कम शिक्षण पूर्ण झाल्यानंतर परत केली जाते.वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या नीट प्रवेश परीक्षेतून स्वतःला सिद्ध करून गुणवत्ता असूनही प्रवेशाच्या स्पर्धेत अनेक विद्यार्थ्यांना खाजगी महाविद्यालयातील शुल्क परवडत नसल्यामुळे डॉक्टर होण्याची त्यांचे स्वप्न आवाक्याबाहेर असल्यामुळे चांगले गुण मिळून आणि गुणवत्ता असूनही अनेक विद्यार्थ्यांना वंचित राहावे लागते. विनाअनुदानित संस्थांच्या आर्थिक फायद्यासाठी शुल्क नियामक प्राधिकरणाने स्वतःच्या नियमाचे उल्लंघन करत राज्यातील ६९५ खाजगी विनाअनुदानित संस्थांना शुल्कात बेकायदा वाढ करण्याची परवानगी दिल्याचे उघडकीस आले आहे . शुल्क नियामक प्राधिकरणाने ३० ऑक्टोबर नंतर शुल्क वाढीस मान्यता दिलेल्या ६९५ महाविद्यालयाचे प्रस्ताव रद्द करून त्यांना मागील शैक्षणिक वर्षाच्या शुल्क मान्यतेप्रमाणे शुल्क आकारणी करण्यात यावी अशी मागणी जिल्हा सामाजिक कार्यकर्ता संघटनेच्या वतीने अध्यक्ष डॉ. संजय तांदळे, सुदाम कोळेकर, डॉ. लक्ष्मण पवळ ,बाजीराव ढाकणे यांनी दि.६ ऑगस्ट २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील नायब तहसीलदार उगलमुगले मॅडम यांच्या मार्फत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व संबंधित प्रदान सचिवा कडे केली आहे.



## राष्ट्रगीतानंतर आता गर्जा महाराष्ट्र राज्यगीत बंधनकारक

### अमलबजावणी न करणाऱ्या शाळांवर होणार कारवाई-दादा भुसे



**शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांची संख्या वाढवणार**

पूर्वी इयत्ता चौथी आणि सातव्या वर्गाची शिष्यवृत्ती परीक्षा होत होती. त्यानंतर पाचव्या आणि आठव्या वर्गाची शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात आली. मात्र, आता यानंतर इयत्ता चौथी, पाचवी, सातवी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षा घेऊन शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांची संख्या वाढविण्याचा संकल्प दादा भुसे यांनी व्यक्त केला.

**मुंबई । प्रतिनिधी**

**यापुढे इयत्ता चौथी, पाचवी, सातवी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षा होणार असून शिष्यवृत्तीधारकांची संख्याही वाढवण्यात येणार असल्याचे शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी सांगितले. तसेच शाळांमध्ये राष्ट्रगीतानंतर आता गर्जा महाराष्ट्र हे राज्यगीत बंधनकारक करण्यात आल्याचे सांगून याची अमलबजावणी न करणाऱ्या शाळांवर कारवाईचा इशारा त्यांनी दिला आहे.**

मराठी शाळेसोबतचे आता सर्व माध्यमाच्या शाळेत राष्ट्रगीतानंतर राज्यगीत गाणे बंधनकारक करण्यात आले आहे. गर्जा महाराष्ट्र माझा हे राज्यगीत आता सर्वच शाळांमध्ये गाणे बंधनकारक असेल. जी शाळा याची अंमलबजावणी करणार नाही त्यावर कारवाई करण्यात येईल असा इशारा राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी दिला आहे.

**नगर पंचायत कार्यालय, तीर्थपुरी**
प्रशासकीय इमारत, तीर्थपुरी
Email-nptirthpuri2021@gmail.com

जा.क्र.२०२५/नपंती/विकास-योजना/कावि-१८०० दिनांक : ०६/०८/२०२५

**ई-निविदा नोटिस सन २०२५-२६**

मुख्याधिकारी तीर्थपुरी नगरपंचायत हे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रात अधिसुचित विशिष्ट नागरी सेवा व सुविधा पुरविणे सन २०२४-२५ या योजने अंतर्गत नगरपंचायत तीर्थपुरी येथे विविध ठिकाणी सीसी सिमेंट रस्ते व भुमीगत गटार बांधकाम असे एकुण १० कामे करणे बाबत. इत्यादी अनुषगीक कामे करणे करिता ई-निविदा टक्केवारी एल-१ फॉर्ममध्ये अनुभवी व नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन खालील निविदा ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहे.

सदर निविदा नोटीस प्रसिध्दी सुचना आवश्यक असणारी कागदपत्रे. शुध्दीपत्रक इत्यादीची माहिती http://mahatenders.gov.in यासंकेत स्थळावर दि. ०८/०८/२०२५ पासून उपलब्ध होईल.

स्वाक्षरीत/-
मुख्याधिकारी
नगर पंचायत तीर्थपुरी

## पान १ वरून...

### ई-पीक पाहणी करा

२० खातेदारांची पीक पाहणी भरता येऊ शकते. महसूल विभागाचा ई-पीक पाहणी प्रकल्प १५ सप्टेंबरपासून संपूर्ण महाराष्ट्रात राबवण्यात येत आहे. शहापूर शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणीकडे दुर्लक्ष करू नये, असे आवाहन महसूल विभागाने केले आहे. ॲपद्वारे पीक पेरा भरण्याची सुविधा देण्यात आली आहे. ॲपमध्ये नोंदविलेला पीक पेरा थेट सातबारावर येणार आहे.

-----------

### दादा झाडे लावानार पण झाडे जगणार कशी

म्हणत या उपक्रमाची दीर्घकालीन यशस्विता संगोपनावर अवलंबून असल्याचे मत व्यक्त केले.जिल्ह्यात दार वर्षी वृक्षारोपण मोहिमा मोठ्या गाजावाजात राबविल्या जातात, मात्र कित्येक वेळा लावलेली झाडे सुकून जातात त्यामुळे यंदाचा उपक्रम यशस्वी व्हावा, यासाठी फक्त रोपे लावणे नव्हे, तर त्यांचे जपणूक करणेही तितकेच महत्त्वाचे आहे केवळ उपमुख्यमंत्री यांच्या हसे वृक्षारोपण होणार म्हणून घाई गडबडीत वृक्षलागवडीसाठी खड्डे खोदले त्याला खोली घेतली गेली नाही त्यामुळे झाडे लावली जातील पण ती जगली पाहिजेत याची दक्षता घेणे आगामी काळात गरजेचे आहे.

------------

### मुंडे बहीण-भावांची अजित दादांच्या

यांच्यापासून भारतीय जनता पक्षात असणारे राजेभाऊ मुंडे व त्यांचे सहकारी हे मुंडे कुटुंबाच्या जवळचे मानले जात, त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात त्यांचा प्रवेश एक प्रकारे पंकजाताईंना देखील धक्का असल्याचे मानले जात असून त्यामुळे भारतीय जनता पक्षाच्या मुंडे समर्थक गटात तीव्र नाराजी आहे.

**अजितदादा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री झाल्यावर केलेले पहिले भाषण विसरले?**

अजित पवार हे बीड जिल्ह्याचे पालकमंत्री झाल्यानंतर पहिल्यांदा जे भाषण केले त्यामध्ये त्यांनी अनेकांची कान उघडणे करत चुकीच्या लोकांना सोबत ठेवू नका, गुंड, चोर, लुटारु अशा प्रवृत्तीच्या लोकांना पक्षांमध्ये प्रवेश देणार नाही, प्रवेश करण्यापूर्वी समोरच्याची पार्श्वभूमी पाहिली जाईल, असे स्पष्ट केले होते. मात्र बीड जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या घोटाळ्यात शिक्षा भोगून आलेले व सध्या अपील न्यायप्रविष्ट असलेले राजाभाऊ मुंडे व त्यांचा मुलगा तत्कालीन संचालक बाबरी मुंडे यांचा पक्ष प्रवेश घेताना अजितदादा मुंडे पिता पुत्राची पार्श्वभूमी विसरले की स्वतःचे जिल्ह्यातील पहिले भाषण विसरले, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

-----------

### महादेव मुंडे हत्याप्रकरणी

२०२३ रोजी रात्री ८ ते ९ च्या सुमारास परळी कोर्टासमोरील मोकळ्या मैदानात हत्या झालेली आहे. या प्रकरणात परळी शहर पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरूध्द गुन्हा नोंद झाला आहे. मात्र सदर गुन्ह्यातील आरोपीतांचा अद्यापपर्यंत शोध लागलेला नाही. त्या अनुषंगाने एसआरटी गठीत करण्यात आली आहे. एसआयटीने तपास देखील सुरू केला असून त्याचाच एक भाग म्हणून महादेव मुंडे यांच्या हत्येबाबत काही माहिती असल्यास ती कळविण्याचे आवाहन आयपीएस पंकज कुमावत यांनी केले आहे.

------------

### शेख जमीर समग्र शिक्षा अभियानचे

श्रीमती मैनाताई बोराडे यांची दि. ३१ जुलै रोजी सेवानिवृत्ती झाली. उपशिक्षणाधिकारी पद रिक्त झाल्यामुळे शेख जमीर यांच्याकडे उपशिक्षणाधिकारी पदाचा प्रभारी कार्यभार दि.५ ऑगस्ट रोजी देण्यात आला आहे. शेख जमीर यांनी शिरूर (कासार) तालुक्यात १२ वर्षे प्रभारी गटशिक्षणाधिकारी म्हणून उल्लेखनीय काम केले. शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी यांच्याची समन्वय ठेऊन काम केल्यामुळे शिरूर (कासार) तालुक्यात शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी मदत झाली.

-----------

### राजाभाऊ मुंडेंचा राष्ट्रवादीत प्रवेश

संकटमोचक म्हणून तीन दशकांहून अधिक काळ भूमिका बजावली. खास करून सहकार क्षेत्रात त्यांचे योगदान लक्षणीय ठरले. परंतु गोपीनाथ मुंडे यांच्या दुर्दैवी निधनानंतर राजाभाऊंचं राजकीय स्थान झपाट्याने मागे पडत गेलं. गोपीनाथ मुंडेंनंतर त्यांच्या कन्या पंकजा मुंडे यांच्याकडे सगळ्या कार्यकर्त्यांनी आशेने पाहिलं. त्यांच्याकडून मुंडे विचारांचा वारसा पुढे नेण्याची अपेक्षा होती. पण त्या त्या जबाबदारीत अपयशी ठरल्या. राजकारणातील निर्णय, कार्यकर्त्यांशी संवादाचा अभाव, मतदारसंघातील दुर्लक्ष आणि सत्तेतील बदलाचा फटका यामुळे पंकजा यांची प्रतिमा आणि पक्षातील पकड दोन्ही कमजोर झाली. या सगळ्याचा सर्वात मोठा फटका २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत बसला, जेव्हा त्या स्वतः आपल्या गडात पराभूत झाल्या. विशेष म्हणजे या काळात अनेक निष्ठावान कार्यकर्त्यांना दुय्यम वागणूक देण्यात आली. राजाभाऊ मुंडे हेही त्यातलेच एक. राजाभाऊ मुंडेंच्या प्रवेशात केवळ पक्षांतर एवढाच भाग नाही, तर त्यामागे एक मोठा सामाजिक आणि राजकीय विचार आहे. बीड जिल्ह्यात वंजारी मराठा समाजामधील वाढता दुरावा, राजकीय गटबाजी आणि त्यामुळे निर्माण झालेली अस्थिरता लक्षात घेता हा प्रवेश सामाजिक समेटासाठीचा प्रयोग मानला जातो.आमदार प्रकाश सोळंके यांची भूमिका या सगळ्या प्रक्रियेत महत्त्वाची ठरली आहे. त्यांनी केवळ राजकीय समीकरणासाठीच नव्हे, तर राष्ट्रवादीच्या जिल्ह्यातील पुनर्बांधणीसाठीही हा डाव टाकला आहे. राजाभाऊंच्या राजकीय अनुभवासोबतच आता त्यांचे पुत्र बाबरी मुंडे यांचाही राष्ट्रवादीत प्रवेश निश्चित झाला आहे. त्यामुळे या प्रवेशाला पिढ्यानपिढ्या नेतृत्वासाठीची बीजपूजा मानली जात आहे. बाबरी हे सामाजिकदृष्ट्या सक्रिय असून, युवकांमध्ये त्यांची चांगली प्रतिमा आहे. त्यामुळे बीडच्या राजकारणात त्यांचं आगमन एक नव्या दमाचा चेहरा म्हणून पाहिलं जातं. राजाभाऊ मुंडे आणि बाबरी मुंडेंच्या प्रवेशामुळे राष्ट्रवादी अजित पवार गटाला बीडमध्ये नव्याने संजीवनी मिळाली आहे. येत्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये या नव्या घडामोडीचा निश्चितच मोठा परिणाम दिसून येणार आहे. भाजपला आतूनच सुरुंग लावण्याचे हे प्रारंभिक लक्षण असून,अनेक कार्यकर्ते आता 'नवीन दिशा, नवा पक्ष' या भूमिकेतून विचार करत आहेत. राजाभाऊ मुंडे यांच्या प्रवेशामुळे बीड जिल्ह्याच्या राजकारणात एक नवीन समीकरण निर्माण झालं आहे. फक्त एक नेत्याचा प्रवेश एवढ्यावर ही घडामोड मर्यादित नाही, तर हा विचारधारेचा कार्यकर्त्यांच्या आत्मसन्मानाचा आणि नव्या राजकीय पर्वाचा आरंभ आहे. या प्रवेशामुळे गोपीनाथ मुंडेंच्या सहकाऱ्यांचा आवाज पुन्हा ऐकू येणार आहे का? आणि राष्ट्रवादी त्याच्या बळावर बीडमध्ये नवा झेंडा रोवणार का? हे पाहणं अति महत्त्वाचं ठरणार आहे.

-------------

### गोट्या गित्तेवर

जवळपास ४३ गुन्हे दाखल आहेत. तर बीड पोलिसांकडून त्यांच्यावर मकोका अंतर्गत कारवाई देखील करण्यात आली आहे. मग या आधीच गोट्या गितेला पोलिसांनी जेरबंद का केले नाही? असा प्रश्न नागरिकांमधून विचारला जात आहे. आरोपी गोट्या गित्तेच्या विरोधामध्ये दरोडा, दरोड्याचा प्रयत्न, खुनाचा प्रयत्न, जबरी चोरी, अपहरण, खंडणी, शासकीय अधिकाऱ्यांच्या कामात अडथळा आणि इतर गुन्हे गोट्याच्या विरोधात आहेत.

---------

### फडणवीस-शिंदेंमध्ये

नेमका अधिकार कोणाचा असा प्रश्न उपस्थित होत आहे. विभागांना निधी मिळत नाही, मंत्री आणि राज्यमंत्री यांचा अधिकार, अशा अनेक मुद्यावरुन फडणवीस-शिंदे वाद सातत्याने पाहायला मिळत आहे. मात्र आता थेट मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्यातील अधिकारावरून दोघांमध्ये शितयुध्द सुरु असल्याचे दिसत आहे. यातच एकनाथ शिंदे हे एका आठवड्यात दोन वेळा दिल्ली दौऱ्यावर गेल्याने सर्वकाही अलबेल नाही हे दिसत आहे.

**मोदी, शाहा यांच्याशी शिंदेंची दिल्लीत भेट**

महायुतीतील वाद मिटवण्यासाठी लक्ष घाला असे साकडे एकनाथ शिंदेंनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाहांना घातल्याचे सांगण्यात येत आहे. या दोघांची बुधवारी दिल्लीत एकनाथ शिंदेंनी भेट घेतली. यावेळी बंद दाराआड चर्चा झाली आहे. यावेळी शिवसेनेचे आमदार असलेल्या मतदारसंघातील विरोधकांना राष्ट्रवादी आणि भाजपात प्रवेश दिला जात आहे. सेनेच्या नेत्याना आयकरच्या नोटीसा व निधी, प्रकल्प थंड बसत्यात टाकले जात असल्याचेही यावेळी शिंदे यांच्याकडून सांगितले जाण्याची शक्यता आहे.

----------------

### एसटी डेपो आता ६० ऐवजी ९८

जागेतील हिस्सा घेतला जाईल. ही जागा भाड्याने देऊन महामंडळाला सातत्याने उत्पन्न मिळेल. आर्थिक गर्तेत असलेल्या महामंडळाचा तोटा तब्बल १०,३०० कोटींवर गेल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे.

महामंडळाने ५९८ बसस्थानके आणि २५१ आगारांपैकी काही ठिकाणे पीपीपी मॉडेलवर भाडेपट्ट्याने देण्याची प्रक्रिया २० वर्षांपूर्वी सुरू केली होती. त्यावेळी ३० वर्षांसाठी भाडेपट्टा दिला गेला, त्यात ४५ बसस्थानकांचा पुनर्विकास झाला. ऑक्टोबर २०२४ मध्ये हा कालावधी ६० वर्षांपर्यंत वाढवून आणखी ७२ बसस्थानकांचा विकास करण्याचा निर्णय घेतला. मात्र आता हा प्रस्ताव सरकारने थांबवून नव्याने ९८ वर्षांच्या भाडेपट्ट्यासाठी निविदा काढण्याची तयारी सुरू केली आहे. ६० वर्षांचा कालावधी निश्चित करून अवघ्या आठ महिन्यांत तो ९८ वर्षांपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतल्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. तर यावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्रिमंडळ बैठकीत आक्षेप घेतला आहे.

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

गुरुवार दि. ७ ऑगस्ट २०२५




## उद्योग, मराठी भाषा मंत्री डॉ.उदय सामंत यांचा बीड जिल्हा दौरा

बीड । प्रतिनिधी

उद्योग, मराठी भाषा मंत्री डॉ.उदय सामंत यांचा बीड जिल्हा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे असणार आहे. गुरूवार दि. ७ ऑगस्ट, २०२५ रोजी दु. १२.३० वा. छत्रपती संभाजीनगर येथून मोटारीने बीडकडे प्रयाण. दुपारी २-४५ वा. टाटा टेक्नॉलॉजी सेंटर फॉर इन्व्हेशन, इन्होवेशन, इन्क्यूबेशन अँड ट्रेनिंग सेंटर () बीडच्या भूमीपूजन कार्यक्रमास उपस्थिती (स्थळ:- बीड औद्योगिक क्षेत्र). दुपारी ३-३० वा. बीड जिल्हा शिवसेना पदाधिकारी बैठक. (स्थळ:- हॉटेल ग्रँड यशोदा, बार्शी रोड, बीड) सांय ४.३० वा. परभणी जिल्हा शिवसेना पदाधिकारी बैठक. (स्थळ:- हॉटेल ग्रँड यशोदा, बार्शी रोड, बीड) सांय ६.०० वा. बीड येथून मोटारीने कोल्हापूरकडे प्रयाण.

# अंबाजोगाई रोटरी क्लबचा प्रांतपातळीवर पहिला क्रमांक

अंबाजोगाई । प्रतिनिधी

वर्षभरात विविध सामाजिक, आरोग्यविषयक व विधायक उपक्रम राबवून सामान्य माणसांच्या समस्या सोडविण्यात आग्रेसर ठरलेला रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी हा क्लब प्रांतपातळीवर पहिला आला आहे. तर विविध प्रकल्पांची नोंद वरिष्ठ पातळीवर अव्वल ठरल्याने क्लबला इतरही २५ पारितोषिके मिळली आहेत. ही उल्लेखनिय कामगिरी क्लबचे अध्यक्ष कल्याण काळे व सचिव धनराज सोळंकी यांनी मागच्या वर्षात केली.

रोटरी क्लबचा प्रांत हा आठरा जिल्ह्यांचा आहे. व यात एकुण १०५ क्लबचा समावेश आहे. या सर्व क्लब मधून रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीने प्रांतपातळीवर आपल्या उल्लेखनिय कार्यातून पहिला क्रमांक पटकावला आहे. तर क्लबला गेल्या वर्षभरात राबविण्यात आलेल्या १३६ प्रकल्पांपैकी २५ प्रकल्पांना विविध पारितोषिके मिळाली आहेत. जालना येथे झालेल्या प्रांत पातळीवरील बक्षिस वितरण समारंभात रोटरीचे प्रांतपाल सुरेश साबु, सौ.निर्मला साबु, विद्यमान प्रांतपाल सुधीर लातुरे, भावि प्रांतपाल जयेश पटेल, क्षिजित झावरे व मान्यवरांच्या उपस्थितीत हा पारितोषिक वितरण सोहळा झाला. या सोहळ्यात अंबाजोगाईच्या क्लबला विविध पारितोषिकांनी सन्मानित करण्यात आले.अंबाजोगाई रोटरी क्लबने गेल्या वर्षभरात बारा हजार नागरिकांची मधुमेह तपासणी केली. चार हजार जणांची नेत्र तपासणी करून ५४२ जणांच्या मोतीबिंदु नेत्र शस्त्रक्रिया केल्या. २४० बालकांचे टुडी इको तपासणी करून २४ बालाकांच्या मुंबई येथे हृदयरोगाच्या मोफत शस्त्रक्रिया केल्या. ६०० जणांचे रक्तदान ८ शाळांना सॅनेटरी नॅपकिन, शाळेतील गरजू विद्यार्थ्यांनींना ५१ सायकलींचे वाटप, बंधारण्यांची उभारणी, जोगाईवाडी येथे स्मशानभूमीची उभारणी असे अनेक महत्वपुर्ण उपक्रम राबविले. या शिवाय वृक्षारोपन व वृक्षसंगोपन आरोग्य विषयक शैक्षणिक, महिला सक्षमतीकरणाचे विविध उपक्रम राबविले. या सर्व उपक्रमांची दखल घेत. अंबाजोगाईच्या क्लबवर मोठा बक्षीसांचा वर्षाव झाला. त्यामुळे अंबाजोगाई क्लबचे सर्वत्र स्वागत होत आहे.



### विविध प्रकल्प राबविल्याची मिळाली २५ पारितोषिके

### ही मिळाली पारितोषिके:

रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीला यावर्षी बेस्ट क्लब ऑफ द- डिस्ट्रीक्ट, बेस्ट सेक्रेटरी ऑफ द डिस्ट्रीक्ट, पब्लिक इमेज, बेस्ट हेल्थ, सेव्ह गर्ल्स अ‍ॅण्ड एज्युकेशन, सेव्ह चालईल्डस, पी.एच.एफ.ऑवार्ड, टी.आर.एफ. ऑवार्ड, वॉटर मॅनेजमॅंट ऑवार्ड, या शिवाय क्लबच्या अध्यक्षा प्रा.रोहिणी पाठक यांना ऑनलाईन गुरूकुल प्रशिक्षण तर क्लबचे प्रशिक्षक संतोष मोहिते यांना आय.टी.क्षेत्रातील कोडी सोडवा या प्रशिक्षणाचे ऑवार्ड मिळाले. विवेक गंगणे यांनाही उत्कृष्ट कार्याचे पारितोषिक मिळाले.

### धनराज सोळंकी ठरले बेस्ट सेक्रेटरी

अंबाजोगाई येथील रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीचे माजी सचिव धनराज गौतमचंद सोळंकी यांना यावर्षीचा बेस्ट क्लब सेक्रेटरी हा ऑवार्ड देवून उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. सामाजिक व अध्यात्मिक क्षेत्रात सोळंकी हे गेल्या पंधरा वर्षापासुन कार्यरत आहेत. गेल्या वर्षभरात रोटरी क्लबचे सचिव म्हणून त्यांनी केलेल्या उल्लेखनिय कार्याबद्दल बेस्ट सेक्रेटरी म्हणून त्यांना स्मृतीचिन्ह देवून सन्मानित करण्यात आले.

## थोडक्यात....



### प्रेमचंदच्या साहित्यात समाजाचे प्रतिबिंब -प्रा. घाडगे

पाटोदा । प्रतिनिधी

येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालय पाटोदा हिंदी विभागाच्या वतीने दिनांक ३१ जुलै रोजी मुंशी प्रेमचंद यांची जयंती साजरी करण्यात आली प्रेमचंद यांनी आपल्या साहित्यातून गरिबी जातीय विषमता महिला असमानता कृषक आणि मेहनतकश वर्गाची दुर्दशा आणि सामाजिक अन्याय यावर ठाम भूमिका घेतली असून त्यांच्या लेखनातून स्वाधीनता म्हणजे ब्रिटिश हुकूमशाहीची स्वतंत्रता फक्त नव्हे तर सामाजिक बंधने मोडण्याचा संघर्ष असेल हा संदेश आत्मवृत झाला आहे असे प्रतिपादन प्राचार्य घाडगे एस व्ही यांनी केले. पुढे बोलताना ते म्हणाले की प्रेमचंद जी क्या हिंदी उर्दू दोन्ही भाषांमध्ये लिखाण केलेले असून त्यांच्या साहित्यातून समाजाचे यथार्थवादी दर्शन घडवणारे साहित्य लिहिलेले आहे कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हिंदी विभाग प्रमुख डॉ वंदन जाधव यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा कैंसर शेख यांनी मानले या कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते

### जि.प.उपकर योजनेसाठी अर्ज सादर करण्याचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हयातील सर्व शेतक-यांनी जिल्हा परिषद उपकर योजना सण २०२५-२०२६ या आर्थिक वर्षासाठी नैसर्गिक शेती प्रोत्साहन योजने अंतर्गत गांडुळ खत निर्मिती या घटकासाठी ५० टक्के अनुदानावर गांडुळखत बेड व कल्चर त्याच प्रमाणे रेशीम शेती विकास कार्यक्रम अंतर्गत उझी माशी कीड नियंत्रण या घटकासाठी ५० टक्के अनुदानावर नायलॉन नेट, जाळी व फेरोमन सापळे खरेदीसाठी योजना सुरु झाली आहे. उपरोक्त योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र शेतकरी लाभार्थ्यांचे अर्ज मागविण्यात येत असून या योजनेचा लाभ घेण्यासाठी ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत पंचायत समिती येथे अर्ज सादर करावेत. योजनेच्या सविस्तर माहितीसाठी आपले क्षेत्र व आपले गांव ज्या पंचायत समिती अंतर्गत येत असेल तेथील कृषी अधिकारी, विस्तार अधिकारी (कृषी) पंचायत समिती यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी एस.एस.सय्यद यांनी केले आहे.

### टकलेवाडीत अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ


गेवराई । प्रतिनिधी

तालूक्यातील टकलेवाडी येथे श्रवण मासा निमित्ताने महंत सुरेशानंद महाराज मठाधिपती श्री श्रेत्र शृंगऋषीगड यांच्या शुभहस्ते रविवारी प्रारंभ झाला असुन, सांगता १० आगस्ट रविवारी रोजी काल्याच्या कीर्तनाने होणार आहे, तरी या महा पर्वणीचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन गांवकरी मंडळी यांनी केले आहे,

सालाबादप्रमाणे या ही वर्षी तालुक्यातील टकलेवाडी येथे संतकुलभुषण माहत्मा नगदनारायण, महंत वै, गुरुवर्य निगामानंद, बाबा, वै, शांतीब्रम्ह तुकाराम रुपनर यांच्या कृपा आर्शीवादाने मंहत सुरेशानंद महाराज यांच्या शुभ हस्ते सप्ताहाचा प्रारंभ झाला असुन , या सप्ताहात श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा, संत, महंताच्या किर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे, गुरुवारी मंहत स्वामी जनार्दन बाबा मठाधिपती, श्री श्रेत्र मच्छिंद्रगड, शुक्रवारी मंहत बालाजी महाराज शास्त्री, मठाधिपती, श्रीराम संस्थान, तिंतरवणी, शनिवारी मंहत दत्ता महाराज गिरी, गोरक्षनाथ संस्थान कुंभेजळगांव, रविवारी काल्याचे कीर्तन मंहत सुरेशानंद महाराज यांचे होणार असुन नंतर महाप्रसाद चे वाटप होणार आहे, तरी भाविक भक्तांनी या महा पर्वणी चा लाभ घ्यावा असे आवाहन समस्त गावकरी टकलेवाडी यांनी केले आहे.

### शेषराव कुलकर्णी यांचे निधन

बीड : शेषराव किसनराव कुलकर्णी पाचेगांवकर (वय ८०) यांचे पहाटे ५:४५ वाजता वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले. ते मूळचे पाचेगाव (ता. गेवराई, जि. बीड) येथील रहिवासी होते. सध्या ते आदित्यनगरी, बीड येथे वास्तव्यास होते. त्यांच्या पश्चात एक भाऊ, एक बहीण, पत्नी, मुलगा, सून, मुलगी, जावई, नातवंडे, पुतणे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने कुटुंबीयांवर शोककळा पसरली आहे. अमरधाम, मोंढा रोड, बीड येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



## भागूजीराव ढेकळे विद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी बससेवा सुरू

गेवराई । प्रतिनिधी

तालुक्यातील पाडळसिंगी येथील कृषि पंडित भागूजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थीनींना, विद्यार्थ्यांना बाहेरगावाहून शाळेत येण्यासाठी गेवराई आगाराच्या वतीने बससेवा सुरू करण्यात आली आहे.

कृषि पंडित भागूजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थीनींना रांजणी, बर्हाणपूर, आहेर वाहेगांव, हिरापूर, टाकळगांव, कानडा पिंपळगांव, पारगांव जप्ती, नांदूर हवेली, खामगांव, कुंभारवाडी, कृष्णानगर, ईटकूर, शिंपेगांव या गावातील विद्यार्थी, विद्यार्थीनींना शाळेत येण्या-जाण्यासाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ गेवराई आगाराच्या वतीने बुधवार दि.०६ पासून नियमित बससेवा सुरू करण्यात आली आहे. बससेवा सुरू करण्यासाठी आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्य थिटे ए. एस., गिरीष देशपांडे, सतीश बहीर यांच्यासह कर्मचार्यांनी परिश्रम घेतले. नियमित बससेवा सुरू केल्याबद्दल गेवराई आगाराचे आगारप्रमुख एल. बी. म्हस्के, सहाय्यक वाहतूक अधिक्षक कालिके टी. डी., वाहतूक निरीक्षक प्रदिप तागड, बसचालक निशिकांत शिंदे, वाहक सुयोग दाभाडे यांचे कृषि पंडित भागूजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य थिटे ए. एस., पर्यवेक्षक राजेंद्र रांजवण व कर्मचार्यांनी स्वागत केले. बससेवा सुरू झाल्याबद्दल विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांनी समाधान व्यक्त केले.



## उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी**

**मिटकॉन प्रशिक्षण केंद्र, जालना व उद्योग विकास विभाग आणि शासकीय औद्योगिक विकास महामंडळे यांच्या वतीने जालना येथे दि.१४ ऑगस्ट २०२५ पासुन एक महीना कालावधीत उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.**

सदरील प्रशिक्षण कार्यक्रमात युवक व युवतींसाठी स्वत:चा उद्योग/व्यवसाय उभारणीसाठी व कर्ज प्रकरण करण्यासाठी हा प्रशिक्षण वर्ग अंत्यत महत्त्वाचा राहणार आहे.या प्रशिक्षण कार्यक्रमात सौर ऊर्जा (सोलर एनर्जी) , विद्युत वाहणे (इलेक्ट्रिकल व्हेअकल) व सायबर सुरक्षा व इतर अनेक उद्योगा बाबतीत थेरी व प्रात्येक्षिकासह मार्गदर्शन राहणार आहे. या प्रशिक्षणात मशिनरी हाताळणे, सोलर एनर्जी प्लेट तयार करणे, कच्चामाल, साहीत्य ,कॅपीसिटी, जोडणी व विक्रीव्यवस्था, बिघाड दुरुस्ती व उपलब्ध प्लॅन्ट या सोबत उद्योग संधी मार्गदर्शन, उद्योग प्रेरणा, संघटन कौशल्य, उद्योजकीय गुणसंपदा, व्यक्तीमत्व विकास, प्रभावी संभाषण कौशल्य, उद्योग व्यवस्थापन, जागेची निवड, बाजारपेठ पाहनीतंत्र, शासकीय व निमशासकीय योजना, जिल्हा उद्योग केंद्राच्या विविध योजना,खादीग्राम उद्योग मंडळाच्या योजना, महामंडळाच्या विविध योजना, कृषी संलग्न योजना, प्रकल्प अहवाल तयार करणे, कर्ज प्रस्ताव तयार करणे, बँकेची कार्यप्रणाली , विक्री व्यवस्था,भांडवल उभारणी ,मनुष्यबळ , विमा संरक्षण, शासकीय परवाने, प्रशिक्षण प्रमाणपत्र इत्यादी बाबतीत तज्ञ प्रशिक्षक, वरिष्ठ अधिकारी व यशस्वी उद्योजकांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

### विद्यार्थ्यांनी बनवलेली मतदान जनजागृतीची चित्रफीत निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर


अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा राजेवाडी येथील शिक्षक श्रीनिवास मोरे निर्मित व दिग्दर्शित शाळेतील इयत्ता ५ वी ते ८ वीच्या विद्यार्थ्यांच्या अभिनयाने बनलेली मतदार जनजागृती विषयीची चित्रफीत नुकतीच निवडणूक आयोगाने आपल्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा राजेवाडी येथे कार्यरत असणारे शिक्षक मैत्री प्रतिष्ठान अंबाजोगाई चे सदस्य श्रीनिवास मोरे यांनी निर्मिती व दिग्दर्शन केलेल्या शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांची व्हिडिओ क्लिपची निवड निवडणूक आयोगाने आयोगाच्या (पोर्टलवर) संकेत स्थळावर उपलब्ध करून दिली आहे. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या या चित्रफितीमुळे ग्रामीण भागातील मतदारांमध्ये मतदान जागृती निर्माण होण्यास मदत होणार आहे. अंबाजोगाईचे तहसीलदार विलास तरंगे यांच्या संकल्पनेतुन ग्रामीण भागातील नागरिकांना तथा मतदारांमध्ये मतदान करण्यासाठी जनजागृती व्हावी यासाठी ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थ्यांना देखील सहभागी करून घेतले आहे. यामध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्याचे संकल्पनेतून राजेवाडी येथील जिल्हा परिषद शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांची शाळेतील आदर्श शिक्षक श्रीनिवास मोरे यांनी एक छोटीशी नाटिका रुपी व्हिडिओ क्लिप तयार करून मतदारांमध्ये मतदान करण्याची जागृती निर्माण करण्याचा छोटासा प्रयत्न केला आहे.

## राज्यात पत्रकारांवरील वाढत्या हल्ल्यांमुळे माध्यम विश्वात अस्वस्थता

मुंबई । प्रतिनिधी

पत्रकारिता करणे महाराष्ट्रात उत्तरोत्तर कठीण होत आहे.. पत्रकारावर हल्ले होताहेत, खोटे गुन्हे दाखल केले जात आहेत, धमक्या दिल्या जात आहेत त्यामुळे माध्यम विश्वात मोठी अस्वस्थत: आहे.कर्जत येथून आलेली बातमी अशीच आहे.. खालापूर तालुक्यातील सावरोली येथील के. डी. एल. बायोटेक औषध उत्पादन कंपनी बंद होऊन बारा वर्षे झाली तरी कामगारांना त्यांचा हिशोब मिळत नाही.. त्या विरोधात कामगारांनी २ जुलै २०२५ रोजी कंपनीच्या गेटसमोर जमा होत निदर्शने केली.. कामगार नेत्यांनी तेथे जी भाषणं केली ती 'संवाद' मराठी चॅनल वरून लाईव्ह दाखविली गेली.. हे पत्रकारांचे कामच आहे.. असं असताना संकेत भासे यांनी पत्रकार बाबू पोटे यांनी आपली बदनामी केली म्हणत पोलिसांकडे तक्रार केली आहे.. पोलिसांनी देखील पत्रकार बाबू सीताराम पोटे यांना नोटीस पाठवून खुलासा मागितला आहे.. एखाद्या सभेच्या ठिकाणी जे घडलं त्याची बातमी देणं पत्रकारांचं कामच आहे.. यात कोणाची बदनामी करण्याचा प्रश्न कुठे येतो? तरीही पत्रकारांच्या विरोधात पोलिसात तक्रारी देऊन त्यांचा आवाज बंद करण्याचा हा प्रयत्न संतापजनक आणि निषेधार्ह आहे..राजकीय वरदहस्तातून आणि पोलिसांचा धाक दाखवत सुरू असलेली ही अरेरावी राज्यातील पत्रकार खपवून घेणार नाहीत.. असा इशारा मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी दिला आहे. अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद, डिजिटल मिडिया परिषद, रायगड प्रेस क्लब आणि पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीने याचा निषेध केला आहे.



## पान ६ वरुन...

### रेशीम उद्योग करणाऱ्या

या अर्जाची छाननी होऊन पूर्वसंमती झालेल्या शेतकऱ्यांना कळविण्यात येणार असून पूर्वसंमती मिळालेल्या लाभार्थ्यांनी त्यांच्या शेडच्या साईजनुसार मच्छरदाणी नेट किंवा नायलॉन नेट खरेदी करून शेडमध्ये लावणे तसेच फेरोमन ट्रॅप चार बॉक्स खरेदी करून त्याचे जीएसटी देयक संबंधित पंचायत समिती मधील कृषी विभागाकडे सादर करावेत त्यानंतर कृषी विभाग (पंचायत समिती) व रेशीम विभागाचे कर्मचारी यांच्याकडून साहित्याची पाहणी होऊन ५० टक्के अनुदानाची रक्कम संबंधित लाभार्थ्याच्या खात्यावर वर्ग होणार आहे. तरी गरजू शेतक-यांनी आपले मागणी अर्ज संबंधित पंचायत समिती मधील कृषी अधिकारी, विस्तार अधिकारी, कृषी कार्यालयास सादर करण्याचे आवाहन जिल्हा रेशिम विकास अधिकारी श्रेणी १ यांनी केले आहे.

### मातोरी ते भगवानगड

नागरिकांना ही आव्हान केले आपल्या आजू बाजुस असे काही धंदे होत असतील तर पोलिस स्टेशन शी संपर्क साधावा आपले नाव गुप्त ठेवण्यात येईल असे आवाहन प्रभारी सपोनी राजेश गडवे यांनी केले आहे.येळे १५३३ हे रात्री पेटोलिंग करत असताना गुप्त माहिती मिळाली की, मातोरी रोड वरून घोगस्परगाव चौकात ठिकाणी टाटा कंपनी चे वाळू ने भरलेला टिपर मातोरी ते भगवानगड रोड वर जात आहे त्या ठिकाणी तत्काळ त्या ठिकाणी गेले असता वाळू ने भरलेला टिपर चक १७उत१८९१ आढळुन आला टिपर चालक नवनाथ प्रल्हाद खोपडे रा मुंगी तालुका शेवगाव जिल्हा अहिल्यानगर यांच्या वर चकलंबा पोलीस ठाण्यात गु. र.न २८४/२५ कलम ३०३(२) भा. न्या.स प्रमाणे ही कारवाई पोलिस अधिक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलिस अधीक्षक सचिन पाडकर, उपविभागीय पोलिस अधिकारी निरज राजगुरू,यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी पोलीस निरीक्षक राजेश गडवे यांनी ही कारवाई करण्यात आली आहे. त्याच्या दोन दिवसात दोन कारवाई मुळे त्याचे चकलांबा परीसरातून अभिनंदन होत आहे

### बेस्ट प्रेसिडेंट ऑफ रोटरी

यांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले रोटरी क्लबच्या विभागात १८ जिल्हे आहेत त्यामध्ये एकूण १०५ रोटरी क्लब येतात त्यामध्ये आपल्या माजलगाव शहराला मिळेल हा पुरस्कार अभिमानाची बाबा आहे निश्चितच मला सामाजिक सेवेमध्ये कार्य करण्यासाठी प्रेरणा व ऊर्जा देणारा हा पुरस्कार आहे या पुढे देखील मी नेहमीच सामाजिक कार्यासाठी अग्रेसर राहील.या कार्यक्रमासाठी रोटरी क्लबचे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर श्री सुरेश साबू, विद्यमान प्रांतपाल सुधीर लातुरे,भावी प्रांतपाल जयेश पटेल, क्षितिज झवारे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

### कुरेशी समाजाने म्हेस व

कुरेशी समाज कायदेशीर नियमांचे पालन करत असल्याचा दावा करतो. मात्र, काही संघटना पोलीस ठाणे तलवाडा आणि व्यक्तींकडून होणारा त्रास सहन न झाल्याने हा निर्णय घेतला. निवेदनातून समाजाने आठ मागण्या मांडल्या. ज्यात एएमपीसीचे ऑनलाइनकरण, एकसमान सेस शुल्क, वाहतूक परवान्यांचे त्वरित वितरण, शासकीय स्लॉटर हाऊस आणि कोंडवाडा सुविधा, बेकायदेशीर गोरक्षण केंद्रांवर बंदी, गोरक्षकांविरोधात कडक कायदे करावेत तलवाडा येथील कुरेशी सामाजा सह सर्व समाजांचाच्या वतीने तलवाडा पोलीस स्टेशन निवेदन दिले यावेळी माजी जि प सदस्य अँड सुरेश हात्ते, माजी पंचायत समिती सदस्य शाम कुंड, माजी सरपंच मिना विष्णू हात्ते, माजी उपसरपंच आक्रम सौदागर, लहुजी बहुजन क्रांती सेनेचे जिल्हाध्यक्ष दादाराव रोकडे, मोयोदिन इनामदार , संतोष हतागळे, सह तलवाडा येथील कुरेशी समाज उपस्थित होता.

### सेवानिवृत्त मेजर औदुंबर

लेफ्टनंट पदी नियुक्ती झाली होती आणि त्यानंतर पदोन्नतीने कॅप्टन आणि नंतर मेजर पदी काम करण्याची संधी मिळाली सैन्य दलामध्ये सीमेवर लेह लडाख, मध्यप्रदेश, बिहार, हरियाणा या ठिकाणी त्यांनी सेवा केलेली आहे सन १९७१ च्या भारत पाक युद्धामध्ये त्यांनी सहभाग नोंदवला होता नियत वयोमानाने सेवानिवृत्त झाल्यानंतर महाराष्ट्र सरकारच्या माजी सैनिकांकरता असलेल्या सेवेत दाखल होऊन त्यांना एनसीसी विभागात मेजर पदी नियुक्ती मिळाली त्यावेळी त्यांनी छत्रपती संभाजी नगर आणि अहमदनगर या ठिकाणी काम केले अहिल्यानगर येथे सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांनी जामखेड रस्त्यावरील सैन्य अधिकारी वसाहतीमध्ये ते स्थायिक झाले त्यांच्या मागे पत्नी दोन मुले नातवंडे असा परिवार आहे.

### केजमधील रेणुका

पैसे स्वीकारलेल्या महिलेला तिचे नाव गाव विचारले असता, तिने तिचे नाव मीना संतोष खराडे (वय ४० वर्षे रा.जुना धानोरा रोड , जीजाऊ नगर , संत कबीर गल्ली बीड) असे सांगितले. सदर महिलेची झडती घेतली असता डमी ग्राहकाने दिलेल्या नमूद वर्णनाच्या ५०० रू. दराच्या १५ नोटा मिळून आल्याने पंचासमक्ष जप्त केल्या. सदर ठिकाणी दोन पीडित महिला मिळून आल्या. पीडीत महिलांना विश्वासात घेवून चौकशी केली असता , त्यांनी सांगितले की, मीना संतोष खराडे आणि तिचा सहकारी शेख शफीक शेख हमीद (वय ३१ वर्ष रा. कुर्बाण अलिशा नगर , दर्गा रोड परभणी), जागामालक रामनाथ ढाकने (फरार, वय ५९ रा. सारूळ )यांनी एका पीडीत महिलेस गुजरात वरून तर दुसरीस बाहेर जिल्ह्यातून आणून , स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी ग्राहकाकडून पैसे घेवून, पीडीत महिलांकडून वेश्या व्यवसाय करुन घेत असल्याचे सांगितले. आरोपी मीना संतोष खराडे हिची दोन पंचा समक्ष झडती घेतली असता, तिच्याकडे डमी ग्राहकाने दिलेल्या १५ नोटा व इतर साहित्य मिळून आले आहे. तिन्ही नमुद आरोपींवर पीडीत महिलांना स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी त्यांना आणून स्वतःच्या ताब्यातील जागेचा वापर करुन त्याच कमाईवर उदरनिर्वाह करुन वेश्याव्यवसाय करण्यास लावले व सदर महिलांचे शोषण करण्याच्या उद्देशाने बोलावले म्हणून त्यांच्या विरुद्ध केज पोलीस ठाण्यात अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ कलम ३,४,५,६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे, तसेच दोन पीडित महिलांची सुटका करण्यात आली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक देविदास गात नियंत्रण कक्ष , पोलीस उप निरीक्षक पल्लवी जाधव , सहायक पोलीस उप निरीक्षक मीरा रेडेकर , महीला पोलीस हवालदार उषा चौरे, शोभा जाधव, पोलीस हवालदार प्रदीप येवले, अशोक शिंदे, पोलीस शिपाई प्रदीप वीर, योगेश निर्धार सर्व नेमणूक अ. मा. वा. प्र. कक्ष यांनी केली.

## अणणाभाऊंनी उपेक्षितांची वेदना साहित्यातून मांडली -डॉ.राजेश इंगोले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

महात्मा फुले स्मारक समिती, अंबाजोगाईच्या वतीने थोर समाजसुधारक, क्रांतीशील विचारवंत आणि लोककवी अण्णा भाऊ साठे यांना १०५ व्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन महात्मा फुले स्मारक समिती, अंबाजोगाईच्या वतीने करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा स्मारक समितीचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून भागवत मसने, प्रा.अनंत कांबळे यांच्यासह समितीच्या कार्यकारी विभागाचे अध्यक्ष बी.के मसने आणि सचिव रत्नदीप गोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरूवात क्रांतीसूर्य महात्मा फुले, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्प अर्पण करून करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रस्ताविक विचारवंत डॉ.किरण चक्रे यांनी केले. प्रमुख व्याख्याते बी.आर.मसने यांनी याप्रसंगी अण्णा भाऊ साठे यांचा संघर्षमय आणि प्रेरणादायी जीवनप्रवास, अण्णा भाऊंचा विषयी जीवनपट उलगडला. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, अण्णा भाऊ आपल्या साहित्याशी, कार्याशी एकरूप झाले. अतिशय विदारक परिस्थिती असताना अण्णा भाऊ भाऊंनी जागतिक दर्जाचे साहित्य विश्व्? निर्माण केले. अण्णा भाऊंनी जे जगले, जे अनुभवले त्याचे चित्रण त्यांनी आपल्या साहित्यात उतरविले. फकिराला अण्णा भाऊंनी अतिशय समर्थपणे आपल्या कलाकृतीतून मांडले. फकिरामधून अण्णा भाऊंनी क्रांतीची मशाल पेटवली व त्यामुळे एक लढाऊ नायक जन्माला आला. विषमतावादी व्यवस्थेवर प्रहार करण्याची ताकद अण्णा भाऊंनी आपल्या दमदार साहित्यातून निर्माण केली. त्यांच्या साहित्याचे रसग्रहण आणि सामाजिक भाष्य हे सर्वांसाठी आजही मार्गदर्शक आहे असे मसने यांनी सांगितले. तर प्रा.अनंत कांबळे यांनी आपल्या भाषणात अभ्यासपूर्ण विवेचन केले. संत तुकाराम यांच्यानंतर १९ व्या शतकात विद्रोही साहित्यकार अण्णा भाऊ हे जन्माला आले असे त्यांनी सांगितले. त्यांनी आपल्या भाषणात विविध कथा, कादंबऱ्या यांचा संदर्भ देऊन आंबेडकरवादी अण्णा भाऊ उपस्थितांसमोर प्रभाविपणे मांडले. यावेळी समाजातील विविध घटकातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार स्मारक समितीच्या वतीने करण्यात आला. या प्रसंगी डॉ.अनिल नरसिंगे आणि सुनिल नरसिंगे यांनी गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना उपयुक्त शैक्षणिक साहित्याचे वाटप करून सामाजिक बांधिलकी जपली. तसेच बीव्हीएससी (पशुवैद्यकीय) अभ्यासक्रमासाठी निवड झाल्याबद्दल कु.स्नेहा संजय साळवे हिचा व तिचे वडील समितीचे कोषाध्यक्ष संजय साळवे व आई यांचा ही सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांनी शाळा न शिकता ही दर्जेदार साहित्य निर्मिती करता येते हे अण्णा भाऊंनी जगाला दाखवून दिले अशा मार्मिक शब्दांत लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे प्रेरणादायी जीवनचरित्र उलगडवून अध्यक्षीय समारोप केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.अनिल नरसिंगे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार डॉ.मिलिंद ढगे यांनी मानले. कार्यक्रमासाठी स्मारक समितीच्या सर्व पदाधिकारी, सदस्य कार्यकर्त्यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमासाठी कलेढले सर, राजू साळवे, आदित्य कदम, गोविंद जोगदंड, राजकुमार ठोके आणि प्रमोद सोनवणे तसेच यावेळी सुभाषराव ताटे, रामेश्वर खाडे, गणेश कदम, सोमेश्वर जाधव, भाऊराव गवळी, कैलास आडे, प्रा.सोमनाथ किरवले, विजय वल्लमवाड यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.



### महात्मा फुले स्मारक समितीकडून अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी अण्णा भाऊंचे जीवनचरित्र प्रेरणादायी - भागवत मसने

राज्य लोकतंत्र

शेत-शिवार

गुरुवार दि. ७ ऑगस्ट २०२५



# कीटकनाशक फवारणी करताना शेतकऱ्यांनी कोणती काळजी घ्यावी?

राज्यात सध्या बळीराजा पिकांवर फवारणीचे काम करत आहे. पण दरवर्षी कीटकनाशक फवारणी करताना अनेक शेतकऱ्यांना विषबाधा होते. तर आज आपण पिकांवर फवारणी करताना शेतकऱ्यांनी कोणती खबरदारी घ्यावी. राज्यात सध्या बळीराजा पिकांवर फवारणीचे काम करत आहे. पण दरवर्षी कीटकनाशक फवारणी करताना अनेक शेतकऱ्यांना विषबाधा होते. तर आज आपण पिकांवर फवारणी करताना शेतकऱ्यांनी कोणती खबरदारी घ्यावी. याची माहिती जाणून घेणार आहेत. पिकांवर तणनाशक किंवा कीटकनाशक फवारणी सुरू असताना उपाशीपोटी राहणे किंवा तंबाखू, धूम्रपान, मद्यपान करून विषारी कीटकनाशकांची फवारणी केल्यामुळे अनेक जणांना विषबाधेला समोरं जावे लागते. त्यासाठी शेतकऱ्यांनी फवारणी दरम्यान हात स्वच्छ धुवावे, फवारणी झाल्यानंतरच तोंडाला स्पर्श करावा. फवारणी करताना तंबाखू चोळणे, किंवा जेवण करणे धोकादायक ठरू शकते. यातून विषबाधा होण्याचा धोका अधिक असतो. फवारणीसाठी वापरण्यात येणाऱ्या रेड मार्क असलेली कीटकनाशके अत्यंत विषारी मानली जातात. अशा रसायनाचे फवारणी करताना त्याचा मानवी शरीरावर परिणाम होऊ शकतो.



त्यामुळे शेतकऱ्यांनी संध्याकाळी किंवा सकाळच्या वेळेस जेवण करूनच फवारणी करावी. फवारणी करताना सुरक्षेची साधने जसे की मास्क, ग्लोव्हज, गॉगल्स हे वापरणे गरजेचे आहे. फवारणी ही संध्याकाळी किंवा सकाळच्या वेळेस करावी. फवारणी करताना नळी मध्ये घाण अडकली तर तोंडाने फुंकर मारू नये. त्यामुळे कीटकनाशक तोंडात जाऊन विषबाधा होण्याची शक्यता असते.

विषबाधेची लक्षण कोणती?

डोळ्याची किंवा त्वचेची जळजळ, उलटी होणे किंवा चक्कर येणे, श्वास घेण्यास अडचण, थकवा किंवा पोटदुखी हे विषबाधेची सामान्य लक्षणे आहेत. अशी कोणतीही लक्षणे दिसून आल्यास शेतकऱ्यांनी त्वरित दवाखान्यात जावे. उपचारासाठी जाताना ज्या कीटकनाशकाची फवारणी केली आहे त्याची बॉटल सोबत घेऊन जावे जेणेकरून योग्य उपचार करता येईल.

## फळझाडांना द्या संतुलित खते



फळझाडांच्या लागवडीचे यशापयश हे जमीन, हवामान, खत व्यवस्थापन आणि पाणी पुरवठा यावर विशेष अवलंबून आहे.यापैकी खत व्यवस्थापनास अन्यन साधारण महत्व आहे. फळझाडांची लागवड केल्यानंतर नियमित आणि भरपूर उत्तम दर्जाची फळे येण्यासाठी जमीन सुपीक ठेवणे जरुरीचे आहे. फळझाडांची वाढ आणि त्यावर होणारी फलधारणा जमिनीतून मिळणाऱ्या पोषक अन्नद्रव्यांवर आणि स्थानिक हवामानावर अवलंबून असते.त्यामुळे या दोन महत्वाच्या बाबीपैकी जमिनीच्या सुपिकतेकडे लक्ष देणे अत्यंत महत्वाचे आहे. जमिनीच्या सुपिकतेकडे दुर्लक्ष झाल्यास झाडांची वाढ कमी होते आणि झाडे किडी व रोगास बळी पडतात.झाडांची वाढ निकोप व्हावी म्हणून योग्य मशागत, तणांचा बंदोबस्त, खतांचा संतुलित पुरवठा, सेंद्रिय पदार्थांचे आच्छादन म्हणून वापर,आच्छादनाची पिके, आंतरपिके इत्यादी मार्गांनी जमिनीची सुपिकता चांगली ठेवणे फायदेशीर ठरते.

फळ झाडांना खते देण्याची योग्य वेळ : सर्वसाधारणपणे फळझाडांना जून-जुलै, सप्टेंबर-ऑक्टोबर व जानेवारी, फेब्रुवारी या महिन्यात खते द्यावीत. परंतू खते देताना प्रत्येक फळझाडाचा बहार येण्याचा व फळे पक्क होण्याचा कालावधी लक्षात घेऊन खते द्यावीत.सर्वसाधारणपणे जून-जुलै महिन्यात संपूर्ण शेणखत अथवा कंपोस्ट खत,संपूर्ण स्फुरद व पालाश ची मात्रा द्यावी. नत्राची मात्रा एक ते दोन हप्त्यात विभागून द्यावी. खते देण्यापूर्वी तज्ञांचा सल्ला घ्यावा.

फळझाडांना खते देण्याची पद्धत : खताची मात्रा देताना मोठ्या विस्ताराखाली खोडापासून एक मीटर लांब ४० ते ५० से.मी. रुंद आणि १५ से. मी. खोल वर्तुळाकार चर काढावा.प्रथम चरात पालापाचोळा आणि शेणखत नंतर रासायनिक खते सर्व बाजूनी टाकावी नंतर चर मातीने बुजवावा.

## पावसाळ्यात शेळ्या, मेंढ्याचे व्यवस्थापन

पावसाळ्यात जनावरांच्या आरोग्याची विशेष काळजी घेणगरजेचे असते, कारण या काळात जनावरांना जंतूसंसर्ग किंवा पोषणा अभावी विविध प्रकारचे आजार होत असतात. वेळीच उपाय केल्यास होणारे नुकसान टाळता येते. यात प्रामुख्याने शेळ्या, मेंढ्याची निगा राखणे महत्त्वाचे ठरते.



पावसाळ्यातील शेळ्यांचे व्यवस्थापन : शरीरावरील परजीवींच्या वाढीकडे लक्ष द्यावे. नवीन करडांचे जंत निर्मूलन करावे. सर्व शेळ्यांचे आंत्रविषार, पी. पी. आर., धनुर्वातासाठी लसीकरण करून घ्यावे.

पैदासक्षम शेळ्यांना खुराक वाढवा. पैदाशीच्या बोकडांची पैदाशीसाठी तयारी करावी. जर एकावेळी शेळ्यांना गाभण घालायचे असेल तर माज ओळखण्यासाठी माज ओळखणारा बोकड गोठ्यात ठेवावा.

पावसाळ्यातील मेंढ्यांचे व्यवस्थापन : पशु वैद्यकाच्या सल्ल्याने कळपातील मेंढ्यांची लाल लघवीचा आजार व कावीळ या रोगाची तपासणी करून उपचार करावे. मेंढ्यांना शिफारसीनुसार जंताचे औषध उपचार करावेत. गाभण मेंढ्याची विशेष काळजी घ्यावी. १ ते १२ महिने वयाच्या कोकरांचे शारीरिक वजन करून घ्यावे. सर्व मेंढ्यांना धनुर्वात रोगाचे लसीकरण करून घ्यावे.

इतर जनावरांची काळजी : गोठ्यामध्ये काही ठिकाणी पाणी गळत असेल तर वेळीच डागडुजी करावी. गोठ्यात हवा खेळती राहील याची दक्षता घ्यावी. गोठ्यामध्ये स्वच्छता ठेवावी, जेणेकरून लघवी व शेणावाटे निघणारे अमोनियम मिथेन वायूमुळे जनावरांच्या डोळ्यांना त्रास होणार नाही. वारा, थंडीपासून बचाव करण्यासाठी योग्य निवारा, गाभण गाई, म्हशींची योग्य व्यवस्था, आरामदायी व उबदार बसण्याची सुविधा तसेच शक्य तेवढे कोरडे वातावरण या काळात ठेवावे.


पावसाळ्यात जमीन ओली, भुसभुशीत झाल्यामुळे जनावर घसरून त्यांना इजा होऊ शकते. दगड व माती खूरांमध्ये जाऊन बसल्यामुळे जनावरांना जखमा होतात. यासाठी खूरांची नियमित तपासणी करावी. पावसाळ्यात ओलसरपणामुळे खूर खराब झाल्यास त्या वेदनांमुळे दुभत्या गाई, म्हशींच्या उत्पादनावर परिणाम होतो. हिरव्या चाऱ्याकरिता ज्वारी, बाजरी, मका, यासारखे पिकांना प्राधान्य द्यावे. याबरोबर बहुवार्षिक पिकांमध्ये यशवंत, मेथी घास यासारखी पिके घ्यावीत.

## योग्य पद्धतीने करा विद्राव्य खतांचा वापर

पिकांचे अधिक उत्पादन घेण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या सर्व निविष्ठांमध्ये पाणी आणि खते या दोन अत्यंत महत्त्वाच्या निविष्ठा आहेत. दोन्ही निविष्ठांचा पारंपारिक पद्धतीने वापर करीत असताना त्याची कार्यक्षमता फक्त ३० ते ४० टक्के मिळते. दोन्ही निविष्ठांचा ठिबक सिंचन पद्धतीमधून वापर केल्याने त्यांची कार्यक्षमता ८० ते ९० टक्के मिळते. त्यामुळे पिकाचे अधिक उत्पादन तर मिळतेच आणि उच्चतम गुणवत्ता मिळते. त्याच बरोबर दोन्ही निविष्ठांच्या वापरामध्ये अनुक्रमे ५० ते ६० आणि २५ ते ३० टक्के बचत होऊन खर्चामध्ये बचत होते.

विद्राव्य खतांच्या मात्रा ठरविण्यापूर्वी माती परीक्षण होणे आवश्यक आहे. आपल्या जमिनीचा सामू, विद्युत वाहकता तसेच जमिनीत उपलब्ध नत्र, स्फुरद, पालाश, सूक्ष्म अन्नद्रव्ये किती आहेत हे लक्षात येते. त्यानुसार विद्राव्य खतांची मात्रा ठरविता येते. विद्राव्य खतांचा वापर शिफारशीनुसार आवश्यक आहे. जमिनीत निंबोळी पेंड, शेणखत आणि गांडूळ खताचा वापर करावा. फर्टिगेशनमध्ये अन्नद्रव्यांची मात्रा ठरवताना माती परिक्षणाचा अहवाल तपासावा. आपणास किती टन किंवा क्विंटल पीक उत्पादन घ्यावयाचे आहे आणि त्यासाठी किती अन्नद्रव्ये पिके जमिनीतून शोषण करतात यानुसार किंवा स्थानिक कृषी विद्यापीठाच्या संबंधित पिकाच्या शिफारशीनुसार अन्नद्रव्यांची मात्रा ठरवावी. फर्टिगेशन करत असताना पिकाच्या अवस्थेनुसार त्वरित बदल करावेत.

फर्टिगेशन तंत्राचा वापर : फर्टिगेशन तंत्रामुळे २५ ते ३० टक्के रासायनिक खतांच्या वापरामध्ये बचत होते. पाण्यात विरघळणारी खते ठिबक सिंचनासोबत वापरल्यास खत वापर कार्यक्षमता ८० टक्क्यांपेक्षा अधिक मिळते. राज्यात द्राक्ष, हरितगृहातील गुलाब, कार्नेशन, जरबेरा, टोमॅटो, ढोबळी मिरचीसाठी पूर्णपणे फर्टिगेशनचा वापर होत आहे. तर डाळिंब, केळी, मोसंबी, संत्रा, पेरू, पपई, ऊस, कापूस पिकांसाठी निम्मे पारंपरिक आणि निम्मे विद्राव्य खतांचा वापर शेतकरी करीत आहे. ठिबकने पाणी देताना पाण्यात विरघळणारी खते दिली पाहिजेत. ठिबक सिंचन हे केवळ फक्त पाणी देण्यासाठी नाही हे लक्षात घेतले पाहिजे.



आवश्यक अन्नद्रव्ये : मुख्य अन्नद्रव्ये – कार्बन, हायड्रोजन, ऑक्सिजन, नत्र, स्फुरद, पालाश.

दुय्यम अन्नद्रव्ये – कॅल्शिअम, मॅग्नेशिअम, सल्फर. सूक्ष्म अन्नद्रव्ये – कॉपर, मँगेनीज, झिंक, लोह, बोरॉन,क्लोरिन, मॉलिब्डेनम, सिलिकॉन

विद्राव्य खताचे फायदे – १०० टक्के पाण्यात विद्राव्य असल्यामुळे आणि त्यातील अन्नद्रव्ये उपलब्ध स्वरूपात असल्यामुळे पिकांस लगेच उपलब्ध होतात. निर्यातक्षम गुणवत्तेचे अधिक उत्पादन मिळते. पिकांना पाणी आणि अन्नद्रव्यांचा नियमित पुरवठा होत असल्यामुळे उत्पादनात भरीव वाढ होते. पिकांच्या गरजेनुसार व अवस्थेनुसार दररोज अथवा दिवसाआड देता येतात. थेट पिकांच्या मुळांच्या कक्षेत दिली जातात, ती मुळांना त्वरित उपलब्ध होतात. खते सौम्य द्रावणातून दिली जात असल्यामुळे मुळावर अनिष्ट परिणाम होत नाही. खते देण्याची पद्धत अतिशय सोपी असल्यामुळे वेळ, मजूर, खर्च, ऊर्जा, यंत्रसामग्रीची बचत होते. खते रोज कमी मात्रेत दिली जात असल्यामुळे अन्नद्रव्ये निचऱ्यावाटे, स्थिरीकरणाद्वारे वाया जात नाहीत. खते आम्लधर्मीय असल्यामुळे जमिनीचा सामू नियंत्रण करण्यास मदत होते. ठिबक संचात क्षार साचत नाहीत. ड्रीपर्स बंद पडत नाहीत. खतांच्या मात्रेमध्ये २५ टक्के बचत होते. सोडियम क्लोराइड्स सारख्या हानिकारक मुलद्रव्यापासून मुक्त असल्यामुळे जमिनीच्या पोताचा ऱ्हास होत नाही. तसेच उत्पादनाची गुणवत्ता अप्रतिम राहते. खते फवारणीसाठी वापरता येऊ शकतात. हलक्या जमिनीतही फर्टिगेशनद्वारे अधिक उत्पादन मिळविणे शक्य होते.

विद्राव्य खते द्यायची साधने : ठिबक सिंचन पद्धतीमध्ये व्हेंचुरी किंवा फर्टिलायझर टँक किंवा इंजेक्शन पंपाव्दारे विद्राव्य खतांचा वापर करता येतो.

व्हेंचुरी : हे पाण्याचा दाबामधील फरकावर चालणारे साधन आहे. व्हेंचुरीद्वारे विद्राव्य खते पाण्याच्या प्रवाहाबरोबर झाडांच्या मुळांच्या कक्षेत दिली जातात. व्हेंच्युरीच्या शोषणाचा दर १२० ते १५०० लिटर प्रती तास असतो. मुख्य वाहिनीवरील व्हॉल्व्हद्वारे कमी जास्त करता येतो. व्हेंचुरी १.०, १.५, २.०, २.५ इंच आकारामध्ये उपलब्ध आहेत.

फर्टिलायझर टँक : ही एक स्टीलची टाकी किंवा एचडीपीई प्लॅस्टिकची असून मुख्य जलवाहिनीस इनलेट व आऊटलेट जोडलेले असते. खतांचे प्रमाण सिंचनाबरोबरच पिकांना दिले जाते. टँक ३०, ६०, ९०, १२०, १६० लिटरमध्ये उपलब्ध आहेत. फवारणी करताना काळजी : पिकास कोणत्या अन्नद्रव्यांची उणीव आहे, अशाच विद्राव्य खतांची निवड करून त्याची फवारणी करावी. उत्तम वाढीसाठी १९:१९:१९ विद्राव्य खताची फवारणी करावी. फुले भरपूर येण्याकरिता १३:४०:१३ ची फवारणी करावी, फळांची, बोंडांची चांगली वाढ होण्यासाठी ०:५२:३४ ची फवारणी करावी. फळे, बोंडे परिपक्व होताना १३:०:४५ ची फवारणी करावी.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१७५३ : साली ब्रिटीश वस्तुसंग्रहालयाची स्थापना करण्यात आली.

१७८९ : अमेरिकेच्या सरकारी युद्ध विभागाची स्थापना झाली.

१९४२ : दुसरे महायुद्ध प्रशांत महासागरातील 'ग्वाडेल कॅनाल' येथे अमेरिकन सैन्य उतरले व दुसर्या महायुद्धातील एक भीषण लढाई खेळली गेली. या घटनेतुनच जपानच्या माघारीस सुरुवात झाली.

१९४७ : थोर हायरडल व त्याच्या सहकाऱ्यांनी बाल्सा लाकडापासुन तयार केलेल्या 'कॉन टिकी' या तराफ्यातुन १०१ दिवसात पॅसिफिक महासागरात ७,००० किमी प्रवास केला.

१९४७ : मुंबई महानगरपालिकेने 'बेस्ट' कंपनी आपल्या ताब्यात घेतली.

१९८१ : सलग १२८ वर्षे प्रकाशित झाल्यावर 'द वॉशिंग्टन स्टार' हे वृत्तपत्र बंद पडले.

१९८५ : जपानचे पहिले अंतराळवीर म्हणून ताकाओ दोई, मोमोरू मोहरी आणि चीकी मुकाई यांची निवड केली गेली.

१९८७ : अमेरिका ते सोव्हिएत संघ पोहून पार करणारे लिन कॉक्स हे पहिले व्यक्ती बनले.

१९९० : गल्फ युद्ध साठी पहिले अमेरिकन सैनिक सौदी अरेबियात पोहोचले.

१९९१ : जमिनीवरुन हवेत मारा करणार्या 'पृथ्वी' या क्षेपणास्त्राची श्रीहरिकोटा येथे तिसर्यांदा यशस्वी चाचणी

१९९७ : चित्रपट निर्माते गौतम घोष यांना इटालियन दिग्दर्शक सिका यांच्या नावाने दिला जाणारा 'व्हिट्टोरिओ डी सिका' हा सन्मान जाहीर

१९९८ : अतिरेक्यांनी दार-ए-सलाम, टांझानिया व नैरोबी, केनिया येथील अमेरिकन वकिलातींवर केलेल्या बॉम्बहल्ल्यात २१२ लोक ठार झाले.

२००० : ब्रिटिश बुद्धिबळ स्पर्धेत नऊ वर्षाखालील गटात भारताच्या संकल्प मोदवलने संयुक्त विजेतेपद मिळवले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८३१ : चर्च ऑफ इंग्लंडचे एक मौल्यवान, शालेय शिक्षक आणि लेखक तसचं, केंब्रिज ॲपोस्टल्स सीक्रेट सोसायटीचे सदस्य फ्रेडरिक फरार यांचा जन्मदिन.

१८७१ : अवनींद्रनाथ टागोर जलरंगचित्रकार, रविंद्रनाथ टागोर यांचे काका, जलरंगातील त्यांचे वेगळे निर्मितीतंत्र हा आधुनिक भारतीय कलेच्या सुरुवातीच्या काळातील एक महत्त्वाचा टप्पा मानला जातो. (मृत्यू: ५ डिसेंबर १९५१)

१८७६ : माता हारी पहिल्या महायुद्धात गाजलेली डच नर्तिका, सौंदर्यवती व गुप्तहेर (मृत्यू: १५ आक्टोबर १९१७)

१९०४ : प्रसिद्ध भारतीय इतिहास, सांस्कृतिक कला व साहित्याचे विद्वान वासुदेव शरण अग्रवाल यांचा जन्मदिन.

१९१२ : केशवराव कृष्णराव दाते हृदयरोगतज्ज्ञ (मृत्यू: )

१९२५ : डॉ. मनकोम्बू साम्बसिवन तथा एम. एस. स्वामीनाथन भारतीय शेतीतज्ज्ञ, हरितक्रांतीचे जनक आणि केन्द्रीय कृषी मंत्री, हरित क्रांतीद्वारे भारताला अन्नधान्यात स्वयंपूर्ण बनवण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. जगभरातील सुमारे ४२ विद्यापीठांनी त्यांना 'डॉक्टरेट' ही पदवी दिली आहे. याखेरीज पद्मश्री, पद्मभूषण व पद्मविभूषण या सन्मानांखेरीज, रॅमन मॅगसेसे, वर्ल्ड फूड प्राइझ व इतर अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी त्यांना गौरवण्यात आलेले आहे.

१९३६ : दोन वेळा अश्डन पुरस्कार विजेते डॉ. आनंद कर्वे यांचा जन्म.

१९४८ : ग्रेग चॅपेल ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू व प्रशिक्षक

१९६६ : विकिपीडियाचे सह-संस्थापक जिमी वेल्स यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८४८ : जेकब बर्झेलिअस स्वीडीश रसायनशास्त्रज्ञ (जन्म: २० ऑगस्ट १७७९)

१९३४ : जॅक्कार्ड लूम चे शोधक जोसेफ मॅरी जाकॉर्ड यांचे निधन. (जन्म: ७ जुलै १७५२)

१९४१ : रविंद्रनाथ टागोर कवी, लेखक, कलावंत, तत्त्वचिंतक आणि शिक्षणतज्ज्ञ, नोबेल पारितोषिक विजेते भारतीय लेखक. 'जन गण मन ' हे भारताचे राष्ट्रगीत त्यांनी लिहिले आहे. (जन्म: ७ मे १८६१)

१९७४ : अंजनीबाई मालपेकर भेंडीबाजार घराण्याच्या शास्त्रीय गायिका (जन्म:)

२००९ : भारतीय हिंदी चित्रपट सृष्टीतील गीतकार आणि अभिनेते गुलशन बावरा यांचे निधन.

२०१८ : भारतीय लेखक आणि राजकारणी तसचं, तामिळनाडू राज्याचे माजी मुख्यमंत्री यांचे निधन.

## ई-पीक पाहणी करताना एवढ्या अंतरावरून घ्यावा लागणार पिकांचा फोटो

पुणे : केंद्र सरकारच्या निर्देशानुसार राज्यात आता खरिपातील ई-पीक पाहणी अर्थात सातबारा उताऱ्यावरील पिकांची नोंदणी डिजिटल क्रॉप सर्व्हे अॅपद्वारे करण्याचा निर्णय भूमी अभिलेख विभागाने घेतला आहे. शेतकऱ्यांना १ ऑगस्ट ते १४ सप्टेंबर या कालावधीत ही पीक पाहणी करता येणार आहे. या अॅपमधून पिकांची नोंदणी करताना शेतीच्या गट क्रमांकापासून ५० मीटरच्या आत पिकांचा फोटो घ्यावा लागणार आहे. विशेष म्हणजे, शेतकऱ्यांना पिकांची नोंदणी करताना मदत करण्यासाठी प्रत्येक गावासाठी एका सहायकाची नेमणूक करण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या नोंदणीचा कालावधी संपल्यानंतर हे सहायक उर्वरित क्षेत्रावरील पिकांची नोंदणी करणार आहेत.

राज्यात ई-पीक पाहणी प्रकल्प १५ ऑगस्ट २०२१ पासून राबविण्यात येत आहे. केंद्र सरकारच्या सूचनेनुसार या प्रकल्पात सुधारणा करून गेल्या वर्षाच्या रब्बी हंगामापासून पीक पाहणी ही डिजिटल क्रॉप सर्व्हे अॅपद्वारे संपूर्ण राज्यात लागू केली आहे. शेतकऱ्यांनी स्वतःच्या मोबाइलद्वारे अॅपच्या माध्यमातून सातबारा उताऱ्यावर शेतात लागवड केलेल्या खरीप पिकांची नोंदणी १ ऑगस्टपासून सुरू होत आहे. यासाठी अॅपचे व्हर्जन ४.०.० अद्ययावत केले असून, गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध आहे. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांनी अॅप अपडेट करून घ्यावे. खरीप हंगामातील शेतकरी स्तरावरील पीक पाहणी १४ सप्टेंबरपर्यंत तर सहायक स्तरावरील पीक पाहणी १५ सप्टेंबर ते २९ ऑक्टोबर या कालावधीत होणार आहे. मात्र, शेतकऱ्यांनी सहायकांवर अवलंबून न राहता शक्य तितकी पीक पाहणी स्वतःच पूर्ण करावी.

# आई वडिल आणि संत सेवा करा- ढोले महाराज

## गोरक्षनाथ टेकडी येथे सचिन महाराज ढोले यांची कीर्तन सेवा

बीड । प्रतिनिधी

सध्याची परिस्थिती पाहता समाजात विरोधी टोकाच्या भूमिका घेणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. मानसन्मान कोणाचा करायचा आणि दूर कोणाला ठेवायचे याचे भान तरुण पिढीला राहिले नाही आई-वडील वृद्धाश्रमात तर गुरूंचाही सन्मान होत नाही अशा परिस्थितीत आजच्या तरुण पिढीने आई-वडील आणि संत सेवा करावी असे आव्हान ढोले महाराज यांनी केले. विसाव्या शतकातील महान संत सद्गुरु किसनबाबा महाराज यांच्या २७ व्या पुण्यस्मरणार्थी गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे अखंड हरिनाम सप्ताह होत आहे. या सप्ताह मध्ये मंगळवारी कीर्तन सेवा ह.भ.प. सचिन महाराज ढोले यांनी अभंग विवेचन करताना सांगितले आज समाज मध्ये खूप मोठी शोकांतिका आहे. तरणी पोर आई वडिलांना सांभाळत नाही वृद्धाश्रम वाढत आहे.



शाळेत तुम्ही सर्व शिकला असाल एक दोन पासून अणुबाँब पर्यंत सर्व काही शिकवतात पण आई वडिलांना सांभाळा हे कोणत्याच अभ्यासक्रमात नाही आई वडिलांची सेवा करा हे फक्त नी फक्त कीर्तनात शिकवतात "जगाच्या पाठीशी तुमच्या जवळ दोन देव आहेत एक आई व दुसरी बाप या दोन देवाची सेवा करा जीवनात काहीही कमी पडणार नाही . पुढे सांगताना ढोले महाराज म्हणतात की संत कधी सांगत नाहीत की मी संत आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम महाराज, संत शांतीब्रम्ह एकनाथ महाराज, संत किसन बाबा महाराज, आणि संत गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज यांनी कधीच सांगितल नाही की मी संत आहे. संताचा गुण आहे संत कधीच तुम्हाला सांगत नाहीत आणि जे ऊर बडवून सांगतात मी संत आहे, मला संत म्हणा म्हणणारे कधीच संत नसतात संतच आयुष्याच समाज कल्यानासाठी आहे. माणस आज पैसे सर्वस्व म्हणून जगत आहे . जीवन जगण्यासाठी पैसे आवश्यक आहे पण पैसाच सर्वस्व म्हणून जगणाऱ्या माणसाला पैसे सुख देऊ शकत नाही. आज करोड रुपये संपत्ती असणारे माणस आहेत त्यांना शांत झोप सुधा लागत नाही केवळ पैसा सुख देऊ शकत नाही म्हणून ढोले महाराज यांनी आपल्या कीर्तन सेवेत विवेचन करताना सांगितले की आई वडील व संताची सेवा करा जीवनात काहीही कमी पडणार नाही. मंगळवारी कीर्तन सेवा समर्पित करताना ढोले महाराज यांना मृदुगसाथ अरुण महाराज कदम व प्रमोद महाराज पदमुले यांनी दिली आज मंगळवारी संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या संत ज्ञानेश्वरी ग्रंथावर प्रवचन सेवा जानकीराम महाराज घुमरे यांनी केले केली .प्रवचन कीर्तन, अभंगवाणी, भारुड, हरिजागर करण्यात आला.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा ७ ऑगस्ट रोजीचा दौरा कार्यक्रम

बीड। प्रतिनिधी

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांचा दि. ७ ऑगस्ट, २०२५ रोजीचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे असणार आहे. उपमुख्यमंत्री श्री.पवार हे दिनांक ०७ ऑगस्ट रोजी सकाळी ०६.३० वा. विविध विकास कामांची पाहणी करणार आहेत. यामध्ये चंपावती क्रीडा संकुल पाहणी , श्री क्षेत्र कंकालेश्वर मंदिर परिसर पाहणी करणार आहे. सकाळी ०९.३० वा. जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे आगमन व इमारत बांधकाम पाहणी व महसूल भवनाचे भूमिपूजन करतील. सकाळी १०-०० वा श्री क्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग विकास आराखडा सादरीकरण / चर्चा. सकाळी १०.४५ वा. जिल्ह्यातील मुख्य इमारतीच्या चे सादरीकरण व चर्चा. सकाळी ११.३०स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई - आराखडा सादरीकरण व चर्चा. दुपारी १२.३० ते १.३० राखीव. दुपारी ०१.३० वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण, छत्रपती शिवाजी महाराज चौक, बीड येथे आगमन.



१) ऊसतोड कामगारांचा मेळावा . २) आरोग्य मित्र योजनेचा शुभारंभ. ३) ग्रामीण गृहनिर्माण (घरकुल) . दुपारी ०२.४५ वा. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सेवा सुविधा क्रमांक ३, बीड औद्योगिक क्षेत्र, बीड येथे आगमन. दुपारी ०२.४५ वा.Centre for Invention, Innovation, Incubation and Training (CIIIT), By Tata Technologies, Beedचे भूमिपूजन करतील. दुपारी ०३.०० वा. खंडेश्वरी मंदिर परिसर, बीड येथे आगमन. दुपारी ०३.०० ते ०४.०० वा. जिल्ह्यातील वृक्ष लागवड कार्यक्रमास उपस्थित राहतील. सांय ०४.१५ वा. स.मा. गर्गे पत्रकार भवन, तुळजाई चौक, बीड येथे आगमन व नंतर बीड जिल्हा पत्रकार संघाचा कार्यक्रमात उपस्थित राहतील. नंतर मोटारीने प्रयाण . सांय ०५-३० वा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, वडवणी, ता. वडवणी, जि. बीड येथे आगमन व कार्यकर्ता मेळाव्यास उपस्थिती. रात्रौ ०९.२५ वा. छत्रपती संभाजीनगर विमानतळ, छत्रपती संभाजीनगर येथे आगमन व ०९.३० वा. विमानाने पूणेकडे प्रयाण करतील.

# तुलसी योगा सेंटरची बीडमध्ये प्रभावी सुरुवात



बीड। प्रतिनिधी

तुलसी शैक्षणिक समूह, बीड यांच्या वतीने तुलसी संगणकशास्त्र आणि माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीड येथे 'तुलसी योगा सेंटर' या नव्या उपक्रमाची नुकतीच सुरुवात करण्यात आली असून, बीड शहरात प्रथमच शास्त्रोक्त पद्धतीने योगासने, प्राणायाम, ध्यान आणि मेडिटेशनचे प्रशिक्षण देणारे हे केंद्र सर्व नागरिकांसाठी खुले करण्यात आले आहे.या केंद्राचे मार्गदर्शन योगशिक्षक डॉ.सुनील जोंधळे हे करत असून, त्यांच्या अनुभवसंपन्न नेतृत्वाखाली नियमित योगसत्रे सुरू झाली आहेत. या प्रशिक्षणाला विद्यार्थ्यांपासून ते जेष्ठ नागरिकांपर्यंत सर्व वयोगटातील साधकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.

या उपक्रमात योगासने, शारीरिक लवचीकता वाढवणारे व्यायाम, मानसिक एकाग्रता वाढवणारे ध्यान, तसेच आरोग्यदायी जीवनशैली घडवण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन अशा विविध घटकांचा समावेश आहे. महिलांसाठी स्वतंत्र सत्रांचीही व्यवस्था करण्यात आली असून, त्यांच्या सोयीसाठी विशिष्ट वेळा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. योग प्रशिक्षणासाठी सकाळी व संध्याकाळी अशा दोन सत्रांत वर्गांचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांनी आपल्या वेळेनुसार कोणत्याही सत्रात सहभागी होण्याची मुभा आहे. मानसिक आरोग्य, तणावमुक्त जीवनशैली आणि शारीरिक सुदृढतेसाठी हे प्रशिक्षण उपयुक्त ठरणार असून, 'तुलसी' संस्थेने या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपासून सर्वसामान्य नागरिकांपर्यंत आरोग्यसंपन्न जीवनशैलीचा संदेश पोहोचवण्याचा प्रयत्न केला आहे. या योग केंद्राचा लाभ अधिकाधिक नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# महात्मा फुले मार्केट उभारणी व समृद्धी महामार्ग संदर्भात आज मुंबईत बैठक-विष्णू पाचफुले

जालना। प्रतिनिधी

जालना शहरातील महात्मा फुले मार्केट उभारणी तसेच जालना-नांदेड समृद्धी महामार्गाबाबतची दीर्घकाळ प्रलंबित मागणी सोडवण्यासाठी आज, ७ ऑगस्ट रोजी मुंबई येथे राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक होणार आहे. या बैठकीला आमदार अर्जुन खोतकर प्रमुख उपस्थित राहणार असून, जालना शहरातील व्यापारी आणि महामार्गावरील शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.जालना शहरातील व्यापाऱ्यांची महात्मा फुले मार्केट उभारणी ही दीर्घकाळ प्रलंबित मागणी आहे. शहरातील व्यापारी वर्गाने गेल्या काही महिन्यांत अनेक वेळा मोर्चे, धरणे आणि निवेदने देऊन शासनाचे लक्ष वेधले होते.



व्यापारी वर्गाने स्पष्ट केले होते की, आधुनिक व सुसज्ज बाजारपेठेच्या अभावी त्यांचा व्यवसाय अडचणीत आला आहे आणि स्थानिक अर्थव्यवस्था प्रभावित होत आहे. महात्मा फुले मार्केट उभारणीमुळे केवळ व्यापाऱ्यांनाच नव्हे तर शेतकरी आणि ग्राहकांनाही सुविधा उपलब्ध होणार असून, स्थानिक बाजारपेठेत सुव्यवस्था निर्माण होईल. उद्याच्या बैठकीत या विषयावर अंतिम निर्णय होण्याची शक्यता आहे. जालना-नांदेड समृद्धी महामार्गाच्या कामासाठी मागील तीन ते चार महिन्यांपासून शेतकऱ्यांनी विविध प्रकारची आंदोलने केली आहेत. जमीन संपादन, भरपाई आणि पुनर्वसनाशी संबंधित मागण्यांवर तोडगा निघालेला नाही. शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, विकासकामांना आम्ही विरोध करत नाही; परंतु आमचे हक्क अबाधित राहणे आवश्यक आहे. समृद्धी महामार्गामुळे नांदेड, हिंगोली आणि जालना जिल्ह्यातील शेतीमाल वाहतुकीला गती मिळेल आणि औद्योगिक गुंतवणुकीस चालना मिळेल. त्यामुळे हा महामार्ग स्थानिक विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. उद्याच्या बैठकीकडून शहरवासीयांना मोठ्या अपेक्षाशिवसेना शहरप्रमुख विष्णू पाचफुले यांनी सांगितले,व्यापारी आणि शेतकऱ्यांच्या मागण्यांवर राज्यस्तरीय पातळीवर चर्चा होणार आहे. उद्याच्या बैठकीत सकारात्मक निर्णय होईल असा आम्हाला पूर्ण विश्वास आहे. जालनावासीयांनी केलेला सातत्यपूर्ण लढा आता फळाला येणार आहे.

# आजचा विद्यार्थी उद्याचा नागरीक असल्याचे लक्षात घेवून राबविली मोहिम-खांडेकर

जालना। प्रतिनिधी

जालना महापालिकेने स्व. बाबुराव काळे चौकात विशेष स्वच्छता मोहिम राबवुन राष्ट्रीय हिंदी विद्यालयातील विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे धडे दिले. जालना शहरात स्वच्छता मोहिम अधिक प्रभाविपणे राबविण्याचा महापालिकेचा प्रयत्न आहे. त्यातुनच वेगवेगळ्या प्रभागांमध्ये आणि महापुरुषांच्या पुतळा परिसरात महापालिकेने स्वच्छता मोहिम राबविणे सुरु केले आहे. यावेळी महापालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर, उपायुक्त सुप्रिया चव्हाण, कार्यालयीन अधिक्षक विजय फुलंब्रीकर यांची उपस्थिती होती.



याप्रसंगी महापालिकेच्या यंत्रणेने स्व. बाबुराव काळे यांच्या पुतळ्याची साफसफाई करून परिसरात वाढलेली झाडे-झुडपे काढुन घेतली. तसेच महापालिकेच्या पथकाने राष्ट्रीय हिंदी विद्यालयाला भेट देवून विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे धडे दिले. यावेळी बोलताना आयुक्त श्री. खांडेकर म्हणाले की, आजचा विद्यार्थी हा उद्याचा नागरीक असल्यामुळे त्यांना स्वच्छतेचे महत्व आजच पटवुन देणे आवश्यक असून, हीच बाब लक्षात घेवून आम्ही मोहिम राबविली आणि विद्यार्थ्यांनीही स्वयंस्फुर्तीने सहभाग नोंदविला.

# परळी येथील ऐतिहासिक दर्गा नासर जंगचे अस्तित्व धोक्यात!

## पोलीस अधीक्षक साहेब यांनी संरक्षण द्यावे- सय्यद सलीम बापू

बीड। प्रतिनिधी

परळी येथील ऐतिहासिक दर्गा नासर जंगचे अस्तित्व धोक्यात असून पोलीस अधीक्षक साहेब यांनी ऐतिहासिक देवस्थान दर्गा नासर जंगला संरक्षण द्यावे अशी मागणी तारिक - ए - इनाम संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सय्यद सलीम बापू यांनी केली आहे. परळी येथे महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळांतर्गत येणारी ऐतिहासिक देवस्थान नासर जंग दर्गा असून सदरील दर्गेला खिदमत माश एकूण १७८ एकर इनामी जमीन आहे.गेल्या काही वर्षांपासून सदरील देवस्थान मिळकतीवर येथील स्थानिक भूमाफिया यांचा डोळा असून ते सतत देवस्थान इनामी जमीन लाटण्याचा प्रयत्न करीत आहे. ऐतिहासिक दर्गा नासर जंगच्या मिळकतीवर अतिक्रमण करून टोले जंग इमारती बांधली जात असून सदरील मिळकतीच्या बोगस फेरफार करून पी.टी.आर व पी.आर कार्ड सुद्धा देण्यात आले आहे.तरी या प्रकरणी तारिक - ए - इनाम संघटनेच्या वतीने वेळोवेळी निवेदने देऊन प्रकरण उघडगीस आणण्याचे काम केले आहे.

काल येथील भूमाफिया यांनी परळी नगरपरिषद येथील अधिकारी व कर्मचारी यांच्या संगनमताने ऐतिहासिक दर्गा नासर जंगचे ऐतिहासिक व पुरातत्व पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केले.याप्रकरणी मी स्वतः परळी नगर परिषदेचे मुख्य अधिकारी यांना कॉल करून सदरील प्रकरण न्यायप्रविष्ठ असताना ऐतिहासिक पुरावे का नष्ट केली जात आहे ? असे प्रश्न विचारले असता त्यांनी उडवा - उडवीची उत्तरे दिली.व त्यानंतर मी वक्फ मंडळाचे मुख्य अधिकारी यांना कॉल करून सदरील प्रकरणाची माहिती दिली असता त्यांनी



तात्काळ जिल्हा वक्फ अधिकारी यांना प्रकरणाची चौकशी करून गुन्हे दाखल करण्याचे आदेश देणार असल्याची माहिती दिली. तरी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाअंतर्गत येणाऱ्या ऐतिहासिक दर्गा नासर जंगचे ऐतिहासिक व परतत्व पुरावे नष्ट करण्याचे प्रयत्न हे अत्यंत गंभीर असून हे सर्व प्रकार परळी य थ भूमाफिया,तलाठी,मंडळ,अधिकारी,तालुका निबंध आणि परळी नगर परिषद येथील अधिकारी व कर्मचारी यांच्या संगनमताने होत आहे.या प्रकरणी पोलीस अधीक्षक साहेब यांनी स्वतः लक्ष देऊन वरील प्रकरणात ऐतिहासिक देवस्थान नासर जंगला संरक्षण द्यावे अशी मागणी करत लवकरच परळी पोलीस ठाणे व पोलीस अधीक्षक साहेब यांच्याकडे कायदेशीर तक्रार करणार असल्याचे माहिती तारिक - ए - इनाम संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सय्यद सलीम बापू यांनी प्रसिद्धी माध्यमांना दिलेल्या एका पत्रकातून दिली आहे.

**जाहीर प्रगटन**

**मा. श्री. ए. एम. फडतरे, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १२५९/२०२५

ॲड.कुंभार एस. आर.

अर्जदार : १) स्वाती भ्र. दिलीप पाटील, वय-६७ वर्षे, धंदा-घरकाम, रा. कृष्णाई कल्याण कॉम्प्लेक्स, सुभाष रोड न्यु भाजी मंडई कॉर्नर, बीड ता. जि. बीड, २) स्नेहा पि. दिलीप पाटील मार्फत आम मुख्यत्यार अर्जदार नं. १ स्वाती दिलीप पाटील वय ३९ वर्षे, धंदा-घरकाम, रा. स्वजस हाउस, ११५९ सदाशिव पेठ, हत्ती गणपती जवळ, एस.पी. कॉलेज रोड, पुणे, ३) दिग्विजय पि. दिलीप पाटील मार्फत आम मुख्यत्यार अर्जदार नं. १ स्वाती दिलीप पाटील, वय-३६ वर्षे, धंदा-नौकरी, रा. फॅल्ट नंबर ५०१, सलोना गुजर नगर, थेरगाव पुणे अर्जदार नं. २ व ३ मार्फत आम मुख्यत्यार अर्जदार नं. १ स्वाती भ्र. दिलीप पाटील

विरुध्द गैरअर्जदार निरंक अर्जदार हे भारतीय आहेत

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याअर्थी अर्जदार यानी मयत नामे दिलीप पि. किसनराव पाटील यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.मयत नामे दिलीप पि. किसनराव पाटील, रा. कृष्णाई कल्याण कॉम्प्लेक्स, सुभाष रोड, बीड ता. जि. बीड हे दिनांक २६/०७/२०२३ रोजी कुष्णाई कल्याण कॉम्प्लेक्स, सुभाष रोड, बीड ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क्र. २ ही मयताची मुलगी आहे अर्जदार क्र. ३ हा मायताचा मुलगा आहे. अर्जदार क्र २ व ३ हे बाहेर देशात असल्यामुळे त्यांनी त्यांचे संपूर्ण अधिकार हे आम मुख्यत्यार प्रमाणे अर्जदार क्र. १ आईस दिलेले आहेत मयताचे आई वडील फार वर्षापुर्वी मयत झालेले आहेत. अर्जदार याच्याशिवाय मयताचे इतर कोणीही वारस नाहीत. अर्जदाराचे असेही म्हणणे आहे की, शासकीय कामासाठी, कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदारा चे हक्कात त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबित दिसल्यास त्याना मयताचे वारस असल्याद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. पुढील दिनांक १५/०९/२०२५. आज दिनांक ०५ /०८/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली

स्वाक्षरीत
**क. लिपीक**

**आदेशावरून
स्वाक्षरीत
अधीक्षक
जिवाणू न्यायालय, व. स्तर. बीड**

# केएसपी विद्यालयात बालविवाह प्रतिबंध कायद्याचे धडे

बीड। प्रतिनिधी

दि.०२/०८/२०२५ रोजी आजच्या बदलत्या काळामध्ये मुलांना बालकांचे अधिकार काय आहेत, बालविवाह केल्यामुळे होणारे दुष्परिणाम या बदल माहिती करुन देणे खुप गरजेचे आहे. त्यामुळे शहरातील (कर्मयोगिनी सावित्रीबाई फुले विद्यालय) के.एस.पी विद्यालयात जिल्हा विधी सेवा प्राधिकरण कार्यालय, बीड अंतर्गत कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमास श्रीमती सातव मॅडम, न्यायाधिश, (जिल्हा विधी सेवा प्राधिकरण कार्यालय, बीड), श्री. मंगेश जाधव, (जिल्हा बालसंरक्षण अधिकारी, बीड), श्री. तत्वशिल कांबळे, (अधिकार मित्र) श्री.मिथुन जोगदंड, (अधिकार मित्र) , श्री. ओंकार नाईकवाडे (अधिकार मित्र) यांनी मुलांना खुप छान व सोप्या पध्दतीने माहिती सांगितली.

बालिका मातामृत्यूचे प्रमाण जास्त असते. बालकांच्या आरोग्यावरही विपरीत परिणाम होतो, जसे अल्पवजन, अशक्तता तसेच शैक्षणिक नुकसान विवाहामुळे शिक्षण अर्धवट राहते किंवा थांबते. मुलींना शिक्षणाचे व रोजगाराचे संधी मिळत नाहीत. शिक्षण न झाल्याने आर्थिक स्वावलंबन अशक्य होते. मानसिक परिणाम लहान वयात जबाबदाऱ्या आल्याने मानसिक तणाव, नैराश्य, आत्मविश्वास कमी होतो. भावनिक परिपक्वता नसल्यामुळे वैवाहिक जीवनात संघर्ष होतात.सामाजिक दुष्परिणाम स्त्री-पुरुष समानतेला धोका निर्माण होतो. महिला अत्याचार, कौटुंबिक हिंसाचार या घटना वाढतात. गरीब व मागास समाजांमध्ये हा सध्या असलेला दुष्चक्र अधिक मजबूत होतो. आर्थिक परिणाम शिक्षण आणि रोजगाराच्या संधी गमावल्यामुळे कुटुंबाची आर्थिक स्थिती बिघडते. गरीबीतून गरीबीकडे होणारी वाटचाल चालूच राहते.कायदेशीर परिणाम भारतात १८ वर्षांखालील मुलींचा व २१ वर्षांखालील मुलांचा विवाह कायद्याने गुन्हा आहे. अशा प्रकारे माहि ती देऊन अवगत केले.या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा समग्र शिक्षा विभाग प्रमुख, श्री. ऋषिकेशजी शेळके साहेब तसेच मार्गदर्शक संस्थाध्यक्षा सौ.अंजलीताई शेळके, प्र.मुख्याध्यापक, विशाल सुपेकर व शाळेतील शिक्षक कर्मचाऱ्याच्या उपस्थितीत होते.

# महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा अंबड दौरा

जालना। प्रतिनिधी

राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौऱ्यातील सुधारित कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

शुक्रवार दि.८ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता मत्स्योदरी मंगल कार्यालय अंबड येथे आगमन व महसूल सप्ताहाच्या जिल्हास्तरीय समारोप समारंभास उपस्थिती. दुपारी १.३० वाजता मोटारीने अंबडवरुन जालनाकडे प्रयाण. दुपारी २.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे आगमन व नागरिकांची निवेदने स्विकारण्यासाठी राखीव. दुपारी ३.३० वाजता जिल्हाधिकारी यांच्या समवेत महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी विभाग, भुमि अभिलेख विभागाच्या आढावा बैठकीस उपस्थित राहतील. सायंकाळी ६.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेस उपस्थित राहतील. सायंकाळी ७ वाजता भाजपा कार्यालय जालना येथे राखीव. रात्री ८.३० वाजता मोटारीने जालनावरुन मोतिबाग राजूर मार्गे भोकरदनकडे प्रयाण करतील. रात्री ९.३० वाजता भोकरदन येथे आगमन व मुक्काम करतील.

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी यांचे कार्यालय अंबड ता. अंबड जि जालना**

दूरध्वनी क्रमांक ०२४८३२२००२६
E-Mail ID: tahsildararmbad@gmail.com
जा.क्र. २०२५/ज मा/२ कावी-५४३
दिनांक- २५/०७/२०२५

**जाहीर प्रकटन**

सर्व जनता मौजे. लेंभेवाडी ता. अंबड जि. जालना यांना जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, मौजे, लेभेवाडी ता. अंबड जि. जालना येथील गट क्र. १६०० व १६०९ मधील साधे कुळ व चालू कुळ किसान यदुजी ही नोंद शासकीय व बँके च्या कामाकरिता अडचण येत असल्या कारणाने अनावश्यक असलेली ही नोंद कमी करणे बाबत श्री. लहू रायभान चितामणी रा. आडगाव जावळे ता. पैठण जि. छ. संभाजीनगर यांनी अर्ज सादर केला आहे. त्यानुषंगाने तहसिलदार अंबड याच्या न्यायालयात दिनांक २४/०७/२०२५ रोजी ३.०० वाजता सुनावणी ठेवण्यात आली होती सुनावणी मध्ये मा. तहसिलदार साहेब अंबड यांनी प्रकरणा बाबत जाहीर प्रकटन देण्याबाबत कळविले आहे त्यानुषगाने जाहीर प्रकटन देण्यात येत आहे.

सबब प्रकरणात त्या नोंदी कमी करण्यासाठी कोणाचाही आक्षेप असेल तर लेखी आक्षेप अर्जासह या कार्यालयात कागदोपत्री पुराव्यासह आक्षेप देण्यात यावे जाहीर प्रगटन प्रशीध्दी झाल्याच्या दिनांका पासून ७ दिवसाच्या आत सादर करावे.

**स्वाक्षरीत**
तहसीलदार अंबड

# न्यायालयाच्या अटीचे उल्लंघन केल्याने आरोपीचा अटकपूर्व जामीन रद्द

अंबड। प्रतिनिधी

०४ ऑगस्ट २०२५ रोजी अंबड येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश एम.जे.जे.बेग यांनी आरोपी पंकज सखाराम सोळुंके, सुयोग उर्फ सुशिल मधुकर सोळुंके, गजु उर्फ गजानन उर्फ सचिन गणपत सोळुंके, किशोर प्रभु खराद, सर्व रा. गोंदी ता. अंबड यांना गुंन्हा कलम २३०/२०२५ कलम ३०३(२), ३(५) भारतीय न्याय संहीता प्रमाणे गोंदी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल झाला होता. त्यात त्यांना दिनांक ०१/०७/२०२५ रोजी अटकपूर्व जामीन मंजूर झाला होता. त्यात अटीचे व शर्थीचे वरील आरोपीने पालन केले नाही म्हणुन तो अटकपुर्व जामीन रद्द करण्यात आला.

दिनांक १९/०६/२०२५ रोजी मौजे गोंदी येथील सिध्देश्वर मंदीर परीसरातील गोदावरी नदी पात्रात अवैद्य वाळु उत्खनन व वाहतूक करणार किशोर प्रभु खराद व इतर २१ यांच्या विरूध्द फिर्यादी कृष्णा सांडूजी ऐडके यांनी संबधीत पोलीस स्टेशन गोंदी येथे फिर्याद दिल्यावरून गुंन्हा कलम २३०/२०२५ कलम ३०३ (२), ३(५) भारतीय न्याय संहीता प्रमाणे गोंदी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल झाला होता. यात संबधीत वरील चारही आरोपी यांनी जिल्हा व सत्र न्यायालय, अंबड येथून दिनांक ०१/०७/२०२५ रोजी अटकपूर्व जामीन मंजूर झाला होता. अटकपूर्व जामीन मंजुर करतांना जिल्हा व सत्र न्यायालय अंबड यांनी आरोपी यांना अटी व शर्थीचे पालन करण्याचे आदेश देण्यात आले होते. नमुद गुन्ह्यात तपासा मध्ये योग्य ती मदत करावी या अटीवर वरील संदर्भान्वये जामीन मंजुर केला होता, परंतू सदर आरोपींना नमुद गुन्ह्याचे अनुषंगाने वेळोवेळी पोलीस स्टेशनला बोलावले असता ते पोलीस स्टेशनला आलेले नाहीत व त्यांनी गुन्ह्याचे तपासकामी मदत केली नाही. म्हणून ॲड. वाल्मीक घुगे यांच्या मार्फत अर्जदार बी. यु. पद्मणे पोलीस उपनिरीक्षक, पोलीस ठाणे गोंदी यांच्या वतीने फौजदारी किरकोळ अर्ज क्रमांक २३/२०२५ व २४/२०२५ प्रमाणे अर्ज दाखल केले होते. त्यात आरोपीची जामीन रद्द करावी म्हणुन भारतीय नागरीक सुरक्षा संहीता कलम ४८३(३) अन्वये जामीन रद्द करावी म्हणुन जिल्हा व सत्र न्यायालयात दाद मागविण्यात आली. त्यानुसार आरोपीच्या वतीने विधीज्ञ हजर होउन त्यांनी आरोपीचे लेखी म्हणने सादर केले. त्यानंतर दोन्ही बाजुचा युक्तीवाद ऐकूण मा. जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपींचा मंजुर अटकपूर्व जामीन रद्द केली आहे. या प्रकरणात सरकारपक्षातर्फे जिल्हा सहाय्यक सरकारी वकील, श्री. वाल्मीक घुगे यांनी काम पाहिले.

# जडी-बुटी दिवसानिमित्त आयुर्वेदिक वनस्पतींचे रोपण

## चारशे विद्यार्थी व शेकडो साधकांचा सहभाग

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील पतंजलि योग समिती, अंबाजोगाई यांच्या वतीने पूज्य आचार्य बालकृष्णजी यांच्या जन्मदिनानिमित्त जडी- बुटी दिवस साजरा करण्यात आला. यावेळी आयुर्वेदिक वनस्पतींचे वृक्षारोपण उपक्रमात मान्यवरांसह ४०० विद्यार्थी व शेकडो साधकांनी सहभाग घेतला अशी माहिती धनंजय इंगळे (प्रभारी, पतंजलि योग समिती, अंबाजोगाई.) यांनी दिली आहे.

पूज्य आचार्य बालकृष्णजी यांच्या जन्मदिनानिमित्त जडी बुटी दिवस आयोजित करण्यात आला होता. हा कार्यक्रम रविवार, दिनांक ३ ऑगस्ट २०२५ रोजी येथील ज्ञानदीप पोलिस / सैनिक भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र, लोखंडी सावरगाव येथे संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ब्रह्माकुमारी मंजुषा दीदी (प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय, अंबाजोगाई.) या होत्या तर यावेळी उद्घाटक म्हणून आ.नमिताताई मुंदडा (केज विधानसभा मतदारसंघ), प्रमुख अतिथी म्हणून अनिकेत लोहिया (सचिव, मानवलोक), संजय गंभीरे (शहराध्यक्ष, भाजपा), सौ.स्वप्ना नितेश शिराळे (चेअरमन, आशा फौंडेशन, महाराष्ट्र राज्य.), धनंजय इंगळे (प्रभारी, पतंजलि योग समिती, अंबाजोगाई.), श्रीमती लक्ष्मी देवी (महिला सैनिक), नितेश शिराळे, सोमेन्द्र शास्त्री (आंतरराष्ट्रीय गोल्डमेडल विजेता योगपटू), मुख्य योग प्रशिक्षक दत्ता लांब व आयोजक दत्ता दराडे (संचालक, ज्ञानदीप पोलिस / सैनिक भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र.) या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.



पतंजली योगपीठ हरिद्वार आणि संपूर्ण देशामध्ये ४ ऑगस्ट हा पूज्य आचार्य बालकृष्णजी यांचा जन्मदिवस जडीबुटी दिवस म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्ताने आयुर्वेदिक वनस्पतींचे वृक्षारोपण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी मोफत, निःशुल्क योग शिकविणाऱ्या माजी सैनिक दत्ता लांब (योग शिक्षक व प्राकृतिक चिकित्सक) यांचा केज विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सौ.नमिता अक्षय मुंदडा यांनी अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार केला. यावेळी भागवत कांबळे, सुधाकर गोसावी, दीपक देवळे, योग प्रशिक्षक उत्तरेश्वर पांचाळ आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी धनंजय इंगळे (प्रभारी, पतंजलि योग समिती, अंबाजोगाई.) यांच्या मार्गदर्शनाखाली पुढाकार घेण्यात आला.


# वॉकिंग ट्रॅक की, डंपींग ग्राऊंड

## जोगाईवाडीतील नागरिकांना पडला प्रश्न

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरालगत असलेल्या जोगाईवाडी ग्रामपंचायत हद्दीतील शिवाजीनगर बँक कॉलनी व विद्यानगर या दोन कॉलनीच्या ओपन स्पेस मध्ये सुंदर वॉकिंग ट्रॅक तयार करण्यात आले. स्थानिक नागरिकांच्या पुढाकाराने वृक्षारोपण ही करण्यात आले आहे. ओपन स्पेस मोठे असल्याने येथे लहान मुले विविध खेळ खेळतात. असे असताना ही काही लोक वॉकिंग ट्रॅक मध्ये मोठ्या प्रमाणावर कचरा टाकत आहेत. त्यामुळे या परिसरात सर्वत्र दुर्गंधी पसरली आहे. म्हणून जोगाईवाडीतील नागरिकांना पडला प्रश्न आहे की, हे वॉकिंग ट्रॅक आहे की, डंपींग ग्राऊंड.

अंबाजोगाई शहरालगत असलेल्या जोगाईवाडी ग्रामपंचायत हद्दीतील शिवाजीनगर बँक कॉलनी व विद्यानगर या दोन कॉलनीच्या ओपन स्पेस मध्ये शासन निधीतून सुंदर असे वॉकिंग ट्रॅक तयार करण्यात आले. परंतु, पुर्वेकडील गेटच्या आतील जागेत काही लोक वॉकिंग ट्रॅक मध्ये मोठ्या प्रमाणावर कचरा टाकत आहेत. खरे तर जोगाईवाडी ग्रामपंचायतीच्या वतीने कचरा संकलनासाठी घंटागाडीची चांगली व्यवस्था उपलब्ध करून दिलेली असतानाही काही नागरिक मात्र ग्रामपंचायत प्रशासनाला सहकार्य करण्याऐवजी आपल्या घरातील ओला कचरा आणि सुका कचरा असे वेगवेगळे संकलित न करता तसेच हा कचरा घंटागाडी मध्ये ही न टाकता वॉकिंग ट्रॅकलाच डंपींग ग्राऊंड समजून आणून टाकत आहेत. हे योग्य नाही. काही नागरिकांच्या अशा बेजबाबदार कृतीने परिसरात सर्वत्र दुर्गंधी पसरली आहे. पावसाळ्यात रोगराई वाढू शकते. याची दक्षता म्हणून जोगाईवाडी ग्रामपंचायतीच्या वतीने सदरील कचरा तात्काळ साफ करून श्रावण महिना व सणांच्या पार्श्वभूमीवर शिवाजीनगर बँक कॉलनी व विद्यानगर या दोन कॉलनीच्या ओपन स्पेस मधील वॉकिंग ट्रॅक व परिसर तात्काळ स्वच्छ करावा अशी जनतेतून मागणी होत आहे.



**केज : आज केज येथे माजी खा.डॉ .प्रितमताई मुंडे यानी नियोजित कार्यक्रम आटोपून भाजप नेते रामकृष्ण घुले काका यांच्या निवासस्थान भेट दिली या वेळी युवा नेते सुरज भैय्या घुले व कुटुंबाच्या वतीने डॉ.प्रितमताई मुंडे यांचा सत्कार करण्यात आला.**

# फुलाबाई बांगर यांचे निधन

बीड । प्रतिनिधी

ऊसतोड कामगार संघटनेचे व स्वातंत्र सैनिक कल्याण समितीच माझी अध्यक्ष कै बाबासाहेब बांगर यांच्या पत्नी फुलाबाई बांगर यांचे आज वृद्धपकाळाने निधन झाले मृत्यू समय त्यांचे वय ९९ वर्षे होते



भायाळा तालुका पाटोदा येथील रहिवासी कै बाबासाहेब बांगर यांनी केले अनेक वर्ष ऊसतोड मुकादम संघटनेचे नेतृत्व केले होते त्यांच्या पत्नी फुलाबाई बाबासाहेब बांगर यांचे आज राहत्या घरी वयाच्या ९९ वर्षे निधन झाले भायाळा येथेच त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले सार्वजनिक बांधकाम विभागातील अभियंता स्व वसंत बांगर तसेच डॉक्टर अशोक बांगर यांच्या त्या आई तर विवेक बांगर यांच्या त्या आजी होत्या त्यांच्या पश्चात तीन मुले दोन मुली सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे बांगर कुटुंबीयांवर कोसळलेल्या दुःखात दैनिक राज्य लोकतंत्र परिवार सहभागी आहेत

# रेशीम उद्योग करणाऱ्या शेतकऱ्यांनी ५० टक्के अनुदानासाठी अर्ज सादर करावेत

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्हयात रेशीम शेती केली जाते. तसेच जिल्ह्यात सन २०२५-२६ करिता १५०० शेतकऱ्यांनी तुती लागवडीसाठी नोंदणी केलेली असून रेशीम उद्योगात वर्षाकाठी ३ ते ४ पिकातून २.५ ते ३.०० लक्ष उत्पादन निघत असल्याने शेतकरी रेशीम शेतीकडे वळत असल्याचे दिसून येते. या पिकासाठी सध्या उझी या कीटकाचा प्रादुर्भाव जाणवत आहे. यामुळे पिकामध्ये ३० ते ५० टक्के पर्यंत घट होऊ शकते त्यासाठी शेतकऱ्यांनी उझीनेट व फेरोमन कीटचा अवलंब करणे गरजेचे आहे.**

या अनुषंगाने जिल्हा परिषदेने सन २०२५-२६ करिता नैसर्गिक शेती प्रोत्साहन योजना अंतर्गत उझीमाशी कीड नियंत्रण या घटकासाठी ५० टक्के अनुदानावर नायलॉन जाळी व चार बॉक्स फेरोमन स्ट्राप ट्रॅप खरेदीसाठी योजना सुरू करण्यात आलेली आहे. यासाठी रेशीम उद्योग करणाऱ्या शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी तालुकास्तरावरील पंचायत समितीमधील कृषीविभागाकडे मागणी अर्ज उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. मागणी अर्ज संबंधित कार्यालयास १ महिन्याच्या आत जमा करावयाचे आहेत. अर्जासोबत कोष विक्रीची पावती आणि अर्जावरील इतर कागदपत्र जसे सातबारा, ८अ, बँक पासबुक, आधार कार्ड इत्यादी कागदपत्र देणे आवश्यक आहे.

# मातोरी ते भगवानगड रोडवर वाळूने भरलेला टिपर पकडला

तलवाडा । प्रतिनिधी

पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत पोलीस अधीक्षक म्हणून बीड जिल्ह्यात रुजू झाल्यापासून दोन नंबर वाल्यात बेधडक कारवाई करण्यात येत असून मात्र काही ठिकाणी वाळूची चोरट्या पद्धतीने वाहतूक होत आहे अशीच टाटा कंपनीच्या टिप्पर ने मातोरी ते भगवानगड रोड या ठिकाणी सपोनी राजेश गडवे व त्याच्या टीम सोबत गस्त घालत असताना बाळू ने भरलेल्या टिपर आढळून आला असून ही बाळू नगर जिल्ह्यात जात असताना माहिती मिळाली आहे. - सदरील आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याच्या कडून २५ लाख २० हजार किमतीचा माल जप्त करण्यात आला आहे.



चकलंबा पोलीस ठाणे प्रभारी सपोनी राजेश गडवे आल्या पासुन दोन दिवसात दोन मोठ्या कारवाई अवैध धंद्यावाल्यात केल्या असुन दूसरी कारवाई ही ५ ऑगस्ट रात्री अकरा वाजता अवैध धंदे केसेस कामी सपोनी राजेश गडवे व पोह अमोल यांनी कारवाई केली आहे.कोणी अवैध वाळू करत असेल तर त्याची गय केली जाणार नाही: सपोनी गडवे यांनी केले वाळुमाफीयाना आव्हान प्रभारी पोलीस निरीक्षक राजेश गडवे यांनी पहिल्या दिवशी अवैध वाळू ने भरलेला टेक्टर पकडला तर दुसऱ्या दिवशी पावणे बाराच्या दरम्यान टीपर वाळू ने भरलेला आढळुन आला त्यांच्या या कारवाईमुळे त्याचे स्वागत होत असुन त्यांचीशी संपर्क साधला असता त्यांनी सागितले की, कोणीही बेकायदेशीर मार्गाने अवैध धंदे करत असेल तर त्याची गय केली जाणार नाही.

पान ३ वर

# केजमधील रेणुका कलाकेंद्रावर छापा

## अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाची कारवाई, दोन पिडीत महिलांची सुटका

**केज । प्रतिनिधी**

**केजमधील सारुळ गाव, केज कडे जाणाऱ्या रोडवर रेणुका कलाकेंद्रा मधे चालणाऱ्या वेश्याव्यवसायावर छापेमारी करण्यात आली आहे.यावेळी दोन पीडीत महिलांची सुटका करुन वेश्या व्यवसाय चालविणाऱ्या तिघांवर केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

काल दिनांक ०५/०८/२०२५ रोजी अनैतिक वाहतूक प्रतिबंध कक्ष बीडच्या पोलीस उप निरीक्षक पल्लवी जाधव यांना गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली की , पोलीस ठाणे केज हद्दीत सारुळ गाव येथे रेणुका कलाकेंद्रा मधे दोन महीला बाहेरून आणून वेश्या व्यवसाय करीत आहेत. ही माहिती वरिष्ठांना देण्यात आली. त्यावरून वरिष्ठांनी नियंत्रण कक्षाचे पोलीस निरीक्षक देवीदास भागवत गात यांना सदर ठिकाणी छापा टाकण्याचे लेखी आदेश दिले. त्यावरून गात व अ. मा. वा. प्र. कक्षाच्या प्रमुख पल्लवी जाधव व त्यांचा संपूर्ण स्टाफ यांनी डमी ग्राहक व पंचासह सदर ठिकाणी सापळा रचून , डमी ग्राहकास सदर ठिकाणी पाठवून खात्री केली असता तेथे असलेल्या महिला एजंटने वेश्या गमनासाठी होकार देवून त्यासाठी ७५०० रुपयांची मागणी केली. डमी ग्राहकाने ठरल्या प्रमाणे रक्कम देवून पोलीस पथकास इशारा केला असता, पोलीस पथकाने सदर ठिकाणी छापा मारला.

पान ३ वर



# बेस्ट प्रेसिडेंट ऑफ रोटरी क्लब गोल्डन अवार्डने ॲड.रविंद्र कानडे सन्मानित

माजलगाव । प्रतिनिधी

जालना येथे विभागातील विविध सामाजिक उपक्रम राबवणाऱ्या रोटरी क्लबचा पुरस्कार सोहळा दि ०५ ऑगस्ट रोजी संपन्न झाला या सोहळ्यामध्ये माजलगाव रोटरी क्लबचे अध्यक्ष ॲड रवींद्र कानडे यांना बेस्ट प्रेसिडेंट ऑफ रोटरी क्लब म्हणून गोल्डन अवार्डने सन्मानित करण्यात आले.



सन २०२४-२५ या वर्षांमध्ये रोटरी क्लब ऑफ मजलगांव सिटीचे अध्यक्ष ॲड रवींद्र कानडे यांनी अनेक सामाजीक,सांस्कृतिक,आरोग्य व इतर सेवाभावी उपक्रम यशस्वी राबवले त्यामध्ये प्रामुख्याने आरोग्य,नेत्र, रक्तदान शिबीर त्याचबरोबर वृक्षारोपण,स्टुडेंट टॅलेंट सर्च परीक्षा, शाळेच्या विद्यार्थ्यांना सायकल,स्पोर्ट शूज ,कम्प्युटर,टीव्ही वाटप असे अनेक विविध उपक्रम राबवण्यात आले.या उल्लेखनीय कार्याची विभागीय स्तरावर नोंद घेत त्यांना सन्मानचिन्ह प्रधान करून सन्मानित करण्यात आले.ॲड रवींद्र कानडे यांनी या पुरस्कार प्राप्ती संदर्भात माध्यमाशी बोलताना सांगितले कि,रोटरी क्लबच्या सचिव सौ.लता जोशी,सर्व प्रोजेक्ट चेअरमन व सभासद

पान ३ वर

# सेवानिवृत्त मेजर औदुंबर सहस्त्रबुद्धे यांचे निधन

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी येथील मूळ रहिवासी सध्या अहिल्यानगर येथे स्थायिक असलेले मेजर औदुंबर धोंडोपंत सहस्त्रबुद्धे यांचे दि.०५ ऑगस्ट २०२५ रोजी वर्धापकाळाने ८५ व्या वर्षी अल्प आजाराने निधन झाले..



अहिल्यानगर येथील अमरधाम मध्ये त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले

मेजर औदुंबर धोंडोपंत सहस्त्रबुद्धे यांचे शालेय शिक्षण जिल्हा परिषद माध्यमिक शाळा आष्टी येथे झाले त्यानंतर तात्कालीन औरंगाबाद सध्याचे छत्रपती संभाजी नगर येथे मिलिंद महाविद्यालयामध्ये बीएससी पर्यंतचे शिक्षण घेत असताना महाविद्यालयीन जीवनात एनसीसी चे सीनियर अंडर ऑफिसर पदी काम केल्यामुळे सैन्य दलाची आवड निर्माण झाली होती त्यामुळे सन १९६५ च्या भारत पाक युद्धापूर्वी काही वर्ष अगोदर सैन्य दलामध्ये अधिकारी पदाची परीक्षा उत्तीर्ण होऊन इमर्जन्सी कमिशन प्राप्त केले होते.. त्याचे प्रशिक्षण आय एम ए डेहराडून येथे पूर्ण केल्यानंतर त्यांची सेकंड

पान ३ वर

# कुरेशी समाजाने म्हेस व बैल खरेदी विक्री बंदचे तलवाडा पोलिस स्टेशनला दिले निवेदन

## सर्व समाज बांधवांचा जाहीर पाठिंबा

तलवाडा । प्रतिनिधी

कुरेशी समाजाने पारंपरिक म्हैस व बैल खरेदी विक्री व्यवसायात होत असलेल्या अन्यायाच्या विरोधात तलवाडा पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष पीएसआय माननीय कोळी यांना कुरेशी समाजाच्या वतीने निवेदन सादर करत जनावरांच्या खरेदी-विक्रीवर बंदी घातली आहे.



जमियतुल कुरेश तलवाडा समाज बांधवाच्या नेतृत्वाखाली समाजबांधवांनी कथित गोरक्षकांकडून होणारी मारहाण, शिवीगाळ आणि मॉबलिचिंगच्या घटनांवर तीव्र संताप व्यक्त केला. यामुळे शेतकरी, व्यापारी आणि राज्याच्या अर्थव्यवस्थेला मोठा धक्का बसत असल्याचे त्यांनी सांगितले.

पान ३ वर

# राज रायते यांचे सरपंचा वरील नवीन गीताचे लॉन्चिंग !

## बीडचा आवाज थेट महाराष्ट्रभर घुमतोय

**बीड । प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पाचोड येथे सुप्रसिद्ध गायक राज रायते यांच्या नव्या गीताचे भव्य लॉन्चिंग कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. सरपंच शिवराज भैय्या भुमरे यांच्या व्यक्तिमत्वावर आधारित या गीताचे उद्घाटन खुद्द सरपंच भुमरे यांच्या हस्ते करण्यात आले.**

कार्यक्रमात राज रायते आणि त्यांचे वडील गीतकार प्रल्हादजी रायते यांचा सन्मान करण्यात आला. सरपंच भैय्या यांनी दोघांनाही विशेष गौरवपत्र देत पुढील यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.




राज रायते यांच्या आवाजातील जादू पुन्हा एकदा रसिकांच्या मनात घुमू लागली आहे. कार्यक्रमात राज यांना पाहण्यासाठी आणि सेल्फीसाठी चाहत्यांची गर्दी उसळली होती. डीजेच्या गगनभेदी आवाजात हे गीत लॉन्च झाले आणि उपस्थित कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला. राज रायते यांच्यावर सध्या महाराष्ट्रभरून नव्या गीतांसाठी मागण्या येत आहेत. त्यांच्या दमदार आवाजात हे गीत केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर संपूर्ण भारतात गाजणार हे निश्चित.

# राक्षसभुवनची लढाई पुस्तकाच्या प्रकाशनाने गोदाकाठावरील पराक्रम उजेडात येणार

**बीड । प्रतिनिधी**

**जिल्ह्याला प्राचीन ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा लागलेला आहे. बीड जिल्ह्यातील अनेक ऐतिहासिक घटनांची नोंद इतिहासाने सुवर्ण अक्षरात करून ठेवलेली आहे. यातील महत्त्वाची ऐतिहासिक घटना म्हणजे गोदावारीच्या काठावर झालेली राक्षसभुवनची लढाई. पानिपत संग्रामानंतर मराठेशाही संपली असे शत्रूस वाटू लागले होते.मात्र अवघ्या तीन वर्षातच दि.१० ऑगस्ट १७६३ रोजी राक्षसभुवन येथे मावळ्यांनी निजामाला संपूर्ण पराभूत केले. या विजयाचे औचित्य साधून राक्षसभूवन येथे हिंदवी साम्राज्य विजय दिन साजरा होत आहे.**

मराठेशाहीला २६२ वर्षांपूर्वी मिळालेला विजय आजपर्यंत अंधारात राहिला होता. इतिहास अभ्यासक डॉ.अशोक बांगर यांनी राक्षसभूवनच्या लढाईचा अभ्यास करून पुस्तक रूपाने इतिहास प्रेमी समोर आणला आहे. दि.१० ऑगस्ट २०२५ वार रविवार रोजी अनेक मान्यवर व्यक्तींच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन राक्षसभूवन येथे संपन्न होत आहे. या दिवशी राक्षसभुवन येथील समस्त हिंदू आघाडीच्या वतीने २६२ वा हिंदवी साम्राज्य विजय दिन साजरा होत असून याच कार्यक्रमात राक्षसभुवनची लढाई हे पुस्तक प्रकाशित होत आहे.




पुस्तक प्रकाशनसह शनिदेव अभिषेक, शस्त्र पूजन ,ध्वज पूजन, पोवाडा व व्याख्यानाचे आयोजन केले आहे.

या कार्यक्रमाला कॅबिनेट मंत्री मा.ना.अतुलजी सावे,मिलिंद भाऊ एकबोटे, प्रकाश महाजन,सुभेदार तानाजी मालुसरे यांचे तेरावे वंशज कुणाल दादा मालुसरे, शिवशंभू विचारमंचचे सुधीरजी थोरात, इतिहास अभ्यासक मोहन शेटे व स्थानिक पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाला बहुसंख्य इतिहास प्रेमींनी व नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन समस्त हिंदू आघाडी , २६२ वा हिंदवी साम्राज्य विजय दिन उत्सव समिती यांच्यामार्फत करण्यात आले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal-Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske (mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26
This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske (mokashe) Executive Editor Subhash Vilasrao choure Editors do not necessarily agree with the opinions ex-pressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# महापालिकेत राडा; मनसे कार्यकर्ते आयुक्तांशी भिडले, नेमकं काय घडलं?

पुणे । प्रतिनिधी

महापालिका आयुक्तांना निवेदन देण्यासाठी आलेल्या मनसे कार्यकर्ते आणि महापालिका आयुक्तांमध्ये राडा झाला. यावेळी निवेदन देण्यासाठी आलेले कार्यकर्ते आयुक्तांच्या अंगावर धावून गेल्याने मोठा गोंधळ उडाला. त्यामुळे महापालिकेत एकच धावपळ उडाली. या घटनेनंतर आयुक्तांनी थेट पोलिस आयुक्तांकडे तक्रार केली, तर आयुक्तांना भेटण्यासाठी आलेले मनसे कार्यकर्ते आयुक्तांच्या दालनाबाहेर आंदोलनास बसले. जवळपास दोन तास हा गोंधळ सुरू होता. त्यानंतर मनसेच्या नेत्यांनी महापालिकेत येऊन महापालिका आयुक्तांची भेट घेतली.

काय घडला प्रकार

महापालिका आयुक्त मंगळवारी दुपारी महापालिकेच्या शहर स्वच्छतेची बैठक घेत होते. यावेळी मनसेचे माजी नगरसेवक किशोर शिंदे हे महापालिका आयुक्त बंगल्यात गायब झालेल्या सामानाच्या प्रकरणी निवेदन देण्यासाठी आयुक्त कार्यालयात आले. मात्र, बैठक सुरू असल्याने त्यांनी भेट नाकारली.

त्यामुळे शिंदे यांच्यासह संतापलेल्या कार्यकर्त्यांनी बैठक सुरू असलेल्या हॉलमध्ये प्रवेश करत,



आयुक्तांना बैठकीसाठी आम्ही थांबायचे का? असा जाब विचारला. त्यानंतर आयुक्तांनी तुमचे निवेदन द्या, मग बघू असे सुनावले. त्यानंतर आयुक्त आणि किशोर शिंदे यांच्यात शाब्दिक वाद झाला. त्याचे पर्यवसन काही वेळात एकमेकांच्या अंगावर धावून जाण्यात झाले.

यावेळी आयुक्तांनी आम्हाला गुंड म्हणाले असून, तुला बघून घेतो, घरात घुसून मारतो अशी धमकी दिल्याचा आरोप शिंदे यांनी केला. तर शिंदे आणि त्यांच्या सोबत आलेले कार्यकर्ते निवेदन देण्यासाठी नाही, तर मारण्याच्या उद्देशाने आल्याचा आरोप महापालिका आयुक्त राम यांनी केला आहे.

काय म्हणाले किशोर शिंदे

या घटनेबाबत किशोर शिंदे म्हणाले की, आयुक्तांच्या बंगल्यात गेल्या सामानाबाबत निवेदन देण्यासाठी आम्ही आलो होतो. मात्र, त्यांनी बैठकीत असल्याचे सांगत भेटण्यास नकार दिला. त्यामुळे आम्ही निवेदन देण्यासाठी आत गेलो. त्यावेळी आयुक्तांनी आम्हाला थेट 'मराठी गुंड' म्हणाले. ते आमच्याशी हिंदीत बोलत होते.

त्यामुळे आम्ही त्यांना 'मराठीत बोला' म्हणालो असता, ते म्हणाले 'तुम्ही मराठी गुंड आहात, तुम्हाला घरात घुसून मारेल' अशी धमकी दिली. त्यामुळे आम्ही त्याला विरोध केला असता, ते अधिकाऱ्यांसह आमच्या अंगावर धावून आले. मी माजी नगरसेवक आहे, आमदारकी लढलो आहे. लोकांचे प्रश्न मांडण्यासाठी आलो असताना त्यांनी आम्हाला अशी वागणूक दिली आहे. त्यांच्यावर कारवाई व्हायलाच हवी.

या घटनेबाबत बोलताना आयुक्त म्हणाले की, आमची बैठक सुरू होती. यावेळी हे मनसेचे पदाधिकारी अचानक आत मध्ये आले. त्यांनी थेट मला धमकावयाला सुरुवात केली. 'मराठीत बोला, नाहीतर तुम्हाला महाराष्ट्राबाहेर पाठवेल' असा दम देण्यास सुरुवात केली. त्यावेळी मी त्यांना 'तुमची समस्या सांगा' असे विचारत असताना, त्यांच्या सोबत आलेले कार्यकर्ते थेट माझ्या अंगावर अधिकाऱ्यांसमोर धावून आले.

त्यांची वर्तणूक गुंडासारखी होती. ते निवेदन देण्याच्या उद्देशाने नव्हते, तर मला नुकसान पोहोचविण्याच्या उद्देशाने आले होते. त्यामुळे मी त्यांना गुंडच म्हणालो. अशा लोकांमुळेच मराठी संस्कृती बदनाम होत आहे. मी अधिकारी आहे, लोकांना बांधील आहे. त्यामुळे मी सगळ्यांना भेटतो. पण ही सरळ सरळ गुंडगिरी आहे. त्यामुळे मी पोलिस आयुक्तांकडे तक्रार केली असून, मी गुन्हा दाखल करण्याची तक्रार दिली आहे.

मनसेचे ठिय्या आंदोलन...

या घटनेनंतर मनसेचे निवेदन देण्यासाठी आलेले कार्यकर्ते आयुक्तांच्या कार्यालयाबाहेर ठिय्या आंदोलनास बसले. त्यानंतर काही वेळातच आयुक्तांच्या दालनाबाहेर मोठ्या प्रमाणात मनसे कार्यकर्ते जमले आणि त्यांनी घोषणाबाजी सुरू केली. त्यामुळे महापालिकेकडून सगळी प्रवेशद्वारे बंद करण्यात आली.

यावेळी काही कार्यकर्ते चौथ्या मजल्यापर्यंत पोहोचले आणि त्यांनी जोरदार घोषणा दिल्या. या घटनेवेळी मोठ्या प्रमाणात पोलिस बंदोबस्तही तैनात करण्यात आला होता. तर महापालिकेने दरवाजे बंद केल्याने अनेक कर्मचारीही महापालिकेत अडकून पडले. रात्री उशिरापर्यंत हा गोंधळ सुरू होता.

# उत्तराखंडमध्ये मंचरमधील २४ रहिवासी अडकले, मदतीसाठी सुप्रिया सुळे सरसावल्या

पुणे । प्रतिनिधी

उत्तराखंडमध्ये गेल्या काही दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरू आहे. मंगळवारी दि. ६ ऑगस्ट रोजी उत्तरकाशी जिल्ह्यातील धराली गावात ढगफुटीची घटना घडली. नैसर्गिक आपत्तीमुळे हे गाव या महाप्रलयात वाहून गेले आहे. या ढगफुटीसदृश्य पावसाने अक्षरशः हाहाकार माजवला आहे. या महाप्रलयात चार जणांचा मृत्यू झाला असल्याची माहिती समोर आली असून अनेक जण अडकले आहेत. या घटनेचा थरकाप उडवणारा व्हिडीओ समोर आल्याने एकच खळबळ उडाली आहे.

या नैसर्गिक आपत्तीत महाराष्ट्रातील सुमारे दीडशे पर्यटक अडकले असून या पर्यटकांमध्ये पुणे जिल्ह्यातील मंचर येथील २४ रहिवाशांचा समावेश आहे. याबाबत खासदार सुप्रिया सुळे यांनी ट्वीट केलं आहे. या ट्वीटच्या माध्यमातून सुळे यांनी उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी या परिस्थितीमधून बाहेर पडण्यासाठी मदतीची विनंती केली आहे. उत्तराखंड येथील ढगफुटीची घटना समोर आल्यानंतर मंचर येथील २४ नागरिक अडकले आहेत. गेल्या २४ तासांपासून त्यांच्याशी कोणताही संपर्क झाला नसल्याने त्यांचे नातेवाईक काळजी करत आहेत. खासदार सुप्रिया सुळे यांनी ट्वीट करत अडकलेल्या व्यक्तींची नावे आणि त्यांचा संपर्क क्रमांक दिला आहे. तसेच मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांच्याकडे मदतीची मागणी केली आहे. खीरगंगा नदीच्या पाणी पातळीत अचानक मोठी वाढ झाल्याने नदीने रौद्ररूप धारण केलं आणि अवघ्या काही सेकंदांत किनाऱ्यावरील संपूर्ण वस्ती वाहून गेली. पुराचा खूप मोठा फटका धराली गावाला बसला आहे. पुराच्या तडाख्यात सार काही उद्धवस्त झालं आहे. दरम्यान, प्रशासनाने तातडीने बचावकार्य सुरू केले असून डऊछ, छऊछ, पोलीस दल आणि सैन्याच्या तुकड्या घटनास्थळी दाखल झाल्या आहेत. मदत आणि शोधमोहीम युद्धपातळीवर सुरू आहे.

# ठेकेदारास कारणे दाखवा नोटीस; ढिगाऱ्याखालील जखमींची पालिका आयुक्तांनी घेतली भेट

पुणे । प्रतिनिधी


नांदेड सिटीलगत मुठा नदीपात्रात पालिकेच्या नदीसुधार योजनेतील ड्रेनेज लाईनच्या कामात कामगारांच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष करणे ठेकेदाराला चांगलेच भोवणार आहे. याप्रकरणी पालिकेने खुलासा मागवत ठेकेदारास कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. तसेच दुर्घटनेतील जखमींसह, मृतांच्या नातेवाईकांना भरपाई देण्याच्या सूचना पालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी प्रशासनास दिल्या आहेत.

आयुक्तांनी मंगळवारी सकाळी घटनास्थळाची पहणी केली. तसेच रुग्णालयात उपचार सुरू असलेल्या कामगारांशी चर्चा करत घटनेची माहिती घेतली. पुढील कामावेळी कामगारांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्याच्या सूचनाही केल्या आहेत. पालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी.पी, जायकाचे प्रकल्प प्रमुख जगदिश खानोरे यावेळी उपस्थित होते. पालिका जपानमधील जायका कंपनीच्या माध्यमातून नदीसुधार योजनेचे काम करत आहे. हे काम सुरतमधील न्वायरो कंट्रोल



अँड तोशीबा वॉटर सोल्युशन या कंपनीस दिले आहे. ही कंपनी वरील काम स्थानिक ठेकेदारांकडून करून घेत आहे. त्याच दरम्यान सोमवारी सायंकाळी झालेल्या अपघातात एका कामगाराचा मृत्यू झाला तर तीनजण जखमी झाले. या प्रकरणाची गंभीर दखल घेत आयुक्तांनी कंपनी अधिकाऱ्यांची उद्या तातडीची बैठक बोलविली आहे. कामगारांच्या सुरक्षेसाठी विशेष लक्ष देण्य़ाच्या सूचना देऊनही या नियमांचे पालन होत नसल्याचे या घटनेने समोर आले आहे. त्यामुळे याप्रकरणी कंपनीवर कारवाईचा करण्याचा निर्णय बैठकीत होण्याची शक्यता आहे.

# बाजार समिती उपसभापती पदी शशिकांत गायकवाड बिनविरोध



पुणे । प्रतिनिधी

पुणे बाजार समितीच्या उपसभापती पदी शशिकांत गायकवाड यांची बिनविरोध निवड झाली आहे. बुधवारी (दि.६) झालेल्या निवडणूकीत गायकवाड यांचा एकमेव अर्ज आला. निवडीनंतर बाजार समिती परिसरात गायकवाड यांच्या समर्थकांनी गुलाल उधळत व फटाके फोडून जल्लोष केला. जिल्हा निंबधक प्रकाश जगताप यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम केले. त्यावेळी सभापती प्रकाश जगताप, सचिव डॉ. राजाराम धोंडकर यांच्यासह बाजार समितीचे सर्व संचालक, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

मावळते उपसभापती दत्तात्रय पायगुडे यांनी २८ जुलै रोजी राजीनामा दिला होता. त्यामुळे ही निवडणूक लागली आहे. यापूर्वी ७ जुलै रोजी दिलीप काळभोर यांनी सभापती पदाचा राजीनामा दिला होता. त्यानंतर १८ जुलै रोजी प्रकाश जगताप यांची सभापती पदी निवड झाली आहे. सभापतीनंतर आता उपसभापती निवड झाली आहे. थोडक्यात, बाजार समितीला नवीन कारभारी मिळाले आहेत.

# बारामती: एसटीतील त्या कोयताधारी युवकामुळे अत्यवस्थ असलेल्या महिलेचा दुर्दैवी अंत

बारामती । प्रतिनिधी

बारामती-वालचंदनगर मार्गावरील एसटी बसमध्ये दहा दिवसांपूर्वी एका माथेफिरू तरुणाने कोयत्याने केलेल्या हल्ल्याच्या घटनेत गंभीर जखमी झालेल्या वर्षा रामचंद्र भोसले (वय ४३, रा. यादगार सिटी, बारामती) यांचा पुण्यातील खाजगी रुग्णालयात उपचारादरम्यान बुधवारी (दि. ६) सकाळी दुर्दैवी मृत्यू झाला.

३१ जुलै रोजी काटेवाडी (ता. बारामती) येथे बारामती-वालचंदनगर एसटी बसमधून वर्षा भोसले या त्यांच्या माहेरी निघाल्या होत्या. बस मधील मागील सीटवर बसलेल्या अविनाश शिवाजी सगर (वय २१, मूळ रा. लातूर, सध्या रा. सोनगाव, ता. बारामती) याने अचानक शेजारील सीटवरील पवन अनिल गायकवाड या तरुणावर कोयत्याने हल्ला केला. या अचानक घडलेल्या घटनेमुळे बसमधील प्रवासी, विशेषतः महिला आणि विद्यार्थिनी, भयभीत झाल्या.



काही प्रवाशांनी चालू बसमधून उड्या मारल्या, तर चालकाने प्रसंगावधान राखून बस काटेवाडी उड्डाणपुलावर थांबवली. या गोंधळात स्वतःचा जीव वाचवण्यासाठी पळताना वर्षा भोसले जोरदार पडल्या आणि गंभीर जखमी झाल्या. त्यांच्या मेंदूत मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाल्याने त्या बेशुद्ध झाल्या. वालचंदनगर पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत आरोपी अविनाश सगर याला ताब्यात घेतले. पवन गायकवाड याच्या तक्रारीवरून त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जखमी वर्षा भोसले यांना प्रथम बारामतीतील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आले. प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी पुण्यातील खाजगी रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र, पाच दिवस मृत्यूशी झुंज दिल्यानंतर त्यांची प्राणज्योत मालवली.

वर्षा भोसले या पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या वानेवाडी येथील न्यू इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेजचे प्राध्यापक रामचंद्र भोसले यांच्या पत्नी होत्या. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा आणि एक मुलगी असा परिवार आहे. मूळ इंदापूर तालुक्यातील काटी येथील रहिवासी असलेले भोसले कुटुंब गेल्या अनेक वर्षांपासून बारामतीतील यादगार सिटी येथे वास्तव्यास आहे.या माथेफिरू तरुणाच्या हल्ल्यामुळे एका निरपराध महिलेचा हकनाक बळी गेल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# भिडे वाडा स्मारक बांधकामामुळे वाहतुकीत २५ ऑगस्टपर्यंत बदल



पुणे । प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी रस्त्यावरील भिडे वाडा स्मारकाच्या बांधकामासाठी हुतात्मा चौकातून स्वारगेटकडे जाणाऱ्या वाहतूक व्यवस्थेत बदल केला आहे. दररोज रात्री दहा ते सकाळी सहापर्यंत या भागातील वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात येणार आहे.हा वाहतूक बदल २५ ऑगस्टपर्यंत लागू असेल.

भिडे वाडा स्मारकाचे काम सुरू झाल्याने बांधकाम साहित्य वाहतूक करणारी वाहने, अवजड क्रेन कामानिमित्त ये-जा करणार आहेत. त्यामुळे गाडगीळ पुतळामार्गे छत्रपती शिवाजी रस्त्यावरुन स्वारगेटकडे जाणारी वाहतूक वळविली आहे.या बदलाची अंमलबजावणी सुरू झाल्याची माहिती वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त हिंमत जाधव यांनी दिली. स. गो. बर्वे चौकातून (मॉडर्न कॅफे) स्वारगेटकडे जाणाऱ्या सर्व प्रकारची वाहनांनी जंगली महाराज रस्ता, डेक्कन जिमखाना, खंडोजीबाबा चौक, टिळक रस्तामार्गे इच्छितस्थळी जावे. अप्पा बळवंत चौकातून हुतात्मा चौकमार्गे बेलबाग चौक, स्वारगेटकडे जाणाऱ्या वाहनांनी श्रीकृष्ण चित्रपटगृह रस्त्याने लक्ष्मी रस्त्यावर यावे. बेलबाग चौकातून पुढे जावे.

# मानाचे मंडळ मिरवणूक पंरपरेवर ठाम; अन्य मंडळांची लवकर मिरवणूक सुरू करण्याची मागणी

पुणे । प्रतिनिधी

गणेश विसर्जन मिरवणूक सकाळी ७ वाजता सुरू करण्याच्या मागणीला मानाचे पाच मंडळ आणि इतर तीन मंडळांनी जोरदार विरोध दर्शवला आहे. अन्य मंडळांनी लवकर मिरवणूक सुरू करण्याची मागणी केली आहे. यावर पोलीस आयुक्तांनी घेतलेल्या बैठकीत आज काहीही निर्णय झाला नाही.

मिरवणुकीच्या वेळेबाबत पोलिस आयुक्त अमितेश कुमार, सह पोलिस आयुक्त रंजनकुमार शर्मा आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सर्व मंडळांची बैठक मंगळवारी घेतली. त्यानंतर मानाचे पाच व इतर तीन मंडळांची वेगळी बैठक झाली. लक्ष्मी रस्ता भागातील मंडळांनी असा आरोप केला की, मानाच्या मंडळांच्या मिरवणुकीस खूप वेळ लागत असल्याने इतर



मंडळांना मिरवणूक लवकर सुरू करण्याची परवानगी द्यावी.

बैठकीस श्री कसबा गणपती मंडळाचे अध्यक्ष श्रीकांत शेटे, श्री तांबडी जोगेश्वरी मंडळाचे प्रसाद कुलकर्णी, श्री गुरुजी तालीम मंडळाचे प्रवीणसिंह परदेशी, श्री तुळशीबाग सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे नितीन पंडीत, विकास पवार, केसरी गणेशोत्सव ट्रस्टचे अनिल सपकाळ. श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणेशोत्सव ट्रस्टचे सुनील रासने, महेश सूर्यवंशी, अखिल मंडई मंडळाचे अध्यक्ष अण्णा थोरात, श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणेशोत्सव ट्रस्टचे उत्सव प्रमुख पुनीत बालन, हुतात्मा बाबू गेन मंढळाचे अध्यक्ष बाळासाहेब मारणे अन्य प्रमुख मंडळांचे पदाधिकारी श्रीकांत शिरोळे, अंकुश काकडे, रविंद्र माळवदकर, संजय बालगुडे, श्रीकांत भिसे, पुष्कर तुळजापूरकर, सुनील कुंजीर, विशाल गुंड, आनंद सगरे यावेळी उपस्थित होते.

स्थायी समिती माजी अध्यक्ष श्रीकांत शिरोळे म्हणाले, मानाच्या मंडळांची मिरवणूक सुरू होण्याची प्रतीक्षा करण्याऐवजी इतर मंडळांना मिरवणुकीस परवानगी मिळावी. टिळक रस्ता, लाल बहादूर शास्त्री रस्ता, केळकर रस्ता अशा पर्यायी मार्गांवरून सकाळी ७ वाजता मिरवणूक काढण्याची मुभा मिळावी.

ऋषीकेश बालगुडे म्हणाले, लक्ष्मी रस्त्यावरील अनेक मंडळांना लवकर मिरवणूक सुरू करायची आहे. बेलबाग चौकातून मिरवणुकीस परवानगी दिल्यास वेळ वाचेल. पोलिस व इतर यंत्रणां मंडळांमध्ये भेदभाव करत आहेत. विशाल गुंड यांनीही सांगितले की, लहान मंडळांनाही पोलिसांनी सहकार्य केले, तर मिरवणूक लवकर संपले. आम्ही पर्यायी मार्ग स्वीकारण्यास तयार आहोत. पोलिसांवर आठ प्रमुख मंडळांचा दबाव आहे.

# पुण्यातील वैद्यकीय महाविद्यालयाच्या वसतीगृहात विद्यार्थिनीने जीवन संपवलं; शेवटच्या चिठ्ठीत म्हणाली, आई-बाबा मला माफ करा

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे, पुण्यातील बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयातील द्वितीय वर्षात शिक्षण घेणाऱ्या एका २३ वर्षीय तरुणीने मंगळवारी रात्री वसतिगृहातील एका खोलीमध्ये गळफास घेऊन आपलं जीवन संपवल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेनं परिसरात खळबळ उडाली आहे.

ज्योती कृष्णकुमार मीना (वय २३, रा. राजस्थान) असे आत्महत्या केलेल्या तरुणीचे नाव आहे. ज्योती ही मूळची राजस्थान येथील आहे. ती बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयात द्वितीय वर्षात शिक्षण घेत होती. ती कॉलेजच्या वसतिगृहामध्ये राहत होती. मंगळवारी रात्री तिने एका मोकळ्या खोलीमध्ये गळफास घेत आपलं आयुष्य संपवलं आहे. घटनेची माहिती समजताच सहकाऱ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी तातडीने या घटनेची माहिती पोलिसांना दिली. त्यानंतर बंडगार्डन पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. आत्महत्येपूर्वी लिहिलेली एक चिठ्ठी सापडली आहे. ती नैराश्यात होती, अशी माहिती प्राथमिक तपासात मिळाली आहे. आत्महत्येमागचे निश्चित कारण समजू शकले नाही, अशी माहिती बंडगार्डन पोलीसांनी दिली आहे. बी जे वैद्यकीय महाविद्यालयात शिक्षण घेऊन डॉक्टर होऊ पाहणाऱ्या ज्योती कृष्णकुमार मीनाने मानसिक तणावामुळे आत्महत्या केल्याची माहिती आहे. महाविद्यालयाच्या वसतिगृहातील खोलीतच तिने गळफास घेऊन आयुष्य संपवल्याने खळबळ उडाली. मध्यरात्री दोन वाजण्याच्या सुमारास घटना उघडकीस आली. ज्योतीला मानसिक आजाराची ट्रीटमेंट सुरु होती, अशीही माहिती आहे. सुसाईड नोटमधून तिच्या आत्महत्येच्या कारणाचा उलगडा झाला आहे. आई-वडिलांची माफी तिने त्या चिठ्ठीतून मागितली आहे. विशेष म्हणजे काही दिवसांपूर्वीच तिने टक्कल देखील केल्याचे समोर आले होते.

# पुण्यात २ वर्षांपासून वीजचोरी, रिमोट कंट्रोलने ७७,१७० युनिट चोरले; MSEB ने अखेर पकडला, १९ लाखांचा दंड

पुणे । प्रतिनिधी

महावितरणच्या वीजचोरीच्या घटना सातत्याने घडतात, अनेकदा शेतकऱ्यांवर वीजचोरीचा आरोप केला जातो. मात्र, उद्योगविश्वासतही सरकारी वीजेचा सातत्याने चोरी होत असते. पुण्यातील भोसरी एमआयडीसीमध्ये अशीच वीजचोरीची घटना उघडकीस आली आहे. विशेष म्हणजे गेल्या २ वर्षांपासून ही चोरी करतण्यात येत होती, अखेर या कंपनीच्या मालकाकडून तब्बल १९ लाख १९ हजारांचा दंडही वसुल केला आहे. एका औद्योगिक (चखऊउ) ग्राहकाकडून रिमोटचा वापर करुन केली जाणारी वीजचोरी महावितरणने नुकतीच उघडकीस आणली असून, या ग्राहकाकडून महावितरणने १९ लाख १९ हजारांचा दंड वसूल केला आहे. तसेच वीजचोरीसाठी वापरले जाणारे साहित्य जप्त केले आहे.

महावितरणचे अध्यक्ष तथा लोकेश चंद्र यांनी वीज वितरण हानी कमी करण्याबाबत क्षेत्रिय अधिकाऱ्यांना निर्देश दिले होते. त्यानुसार




महावितरण पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता सुनिल काकडे यांनी वीजचोरी विरोधात मोहीम तीव्र करण्याच्या सूचना दिल्या. गणेशखिंड मंडलाचे अधीक्षक अभियंता सिंहाजीराव गायकवाड व भोसरी विभागाचे कार्यकारी अभियंता अतुल देवकर यांनी खास पथक तयार केले. अतिरिक्त कार्यकारी अभियंता यांच्या नेतृत्वाखाली सहा. अभियंता गजानन झापे, वीज कर्मचारी हर्षद लोखंडे, सोमनाथ गायकवाड, महेश वाघमारे यांनी भोसरी एमआयडीसीमध्ये तपासणी सुरु केली. तेंव्हा मे. गणेश प्रेसिंग या औद्योगिक ग्राहकाकडून रिमोटद्वारे वीजचोरी केली जात असल्याचे आढळले. वीजचोरीसाठी वापरलेले सर्व साहित्य महावितरणने जप्त केले आहे. तसेच या ग्राहकाला मागील दोन वर्षांमध्ये केलेल्या ७७,१७० युनीटच्या वीजचोरी पोटी १९ लाख १९ हजार ३६२ रुपयांचा दंड व २ लाख ३० हजारांचे तडजोड आकाराचे देयक देत दंड वसूल करण्यात आला आहे. महावितरणच्या या कारवाईमुळे वीजचोरांचे धाबे दणाणले आहेत.

# महाराजस्व अभियानाचा लाभ घ्या: तहसीलदार डॉ. सुनील शेळके यांचे आवाहन

वारुळवाडी । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाच्यावतीने १ ते ७ ऑगस्ट कालावधीत राबवण्यात येणाऱ्या महसूल सप्ताहांतर्गत जुन्नर तहसील कार्यालयाच्या नारायणगाव मंडल क्षेत्रात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाचे उद्घाटन तहसीलदार डॉ. सुनील शेळके यांच्या हस्ते झाले. यावेळी नागरिकांनी या अभियानात सहभागी होऊन शासनाच्या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. शेळके यांनी केले.

तहसीलदार डॉ. शेळके यांनी उपस्थितांना शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली. मंडल अधिकारी शितल गर्जे यांनी संजय गांधी डीबीटी लाभार्थ्यांना ग्राम महसूल कार्यालयाशी संपर्क



साधण्याचे आवाहन करत अभियानात वाटप केलेल्या दाखल्यांची आकडेवारी सादर केली. यामध्ये उत्पन्न दाखले ५२, नॉन क्रिमीलेयर १३, जातीचे दाखले ३५, डोमेसाईल ३१ आणि ईडब्ल्यूएस ९ दाखल्यांचे वाटप करण्यात आले. तसेच रेशनिंग कार्डमधील नाव कमी करण्याची २५ आणि ऑनलाइन नोंदणीची ३० प्रकरणे पूर्ण करण्यात आली. कार्यक्रमाला वारुळवाडीचे सरपंच विनायक भुजबळ, नारायणगावच्या सरपंच शुभदा वाव्हळ, उपसरपंच बाबू पाटे, पोलीस पाटील सुशांत भुजबळ, मंडल अधिकारी शितल गर्जे, ग्राम महसूल अधिकारी रुपेश इलग, वर्षा लांडे, पल्लवी पंचवटे, एन.जे. खान, हरिष सातपुते, धनंजय गायकवाड, ई-सेवा केंद्र चालक राजेश बाप्ते, अमित रेपाळे, रेशनिंग दुकानदार इम्रान आत्तार, बबन पानसरे, जयंतीलाल सुराणा, यल्लू लोखंडे, सुजाता डोंगरे, सचिन दहितुले, ओंकार नेहरकर, युवा शक्ती फाऊंडेशनचे अध्यक्ष अशफाक पटेल, महसूल सहाय्यक सागर डोके, रवींद्र खेबडे, संजय गाडेकर, अब्बास तांबोळी यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी तहसीलदार डॉ. सुनील शेळके यांना आदर्श तहसीलदार पुरस्कार मिळाल्याबद्दल मंडल अधिकारी शितल गर्जे, ग्राम महसूल अधिकारी, सरपंच विनायक भुजबळ, अशफाक पटेल, रेशनिंग दुकानदार आणि ई-सेवा केंद्र चालक यांच्याकडून सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शितल गर्जे यांनी केले, तर आभार रुपेश इलग यांनी मानले.